UNIVERSAL
LIBRARY
OU_192428
UNIVERSAL
LIBRARY

रघुनाथ यादव विरचित

# पानिपतची बखर

•

संपादक :

रघुनाथ मुरलीधर जोशी एम्. ए.

•

मराठवाडा साहित्य परिषद् प्रकाशन.

प्रकाशक :

रा. ब. माढेकर

अध्यक्ष, मराठवाडा साहित्य परिषद्

इसामियाँ बाजार, हैद्राबाद (दक्षिण)

मूल्य दीड रुपाया

आवृत्ति पहिली

२५ डिसेंबर १९५५

मुद्रक :

जयहिंद प्रिंटिंग प्रेस

मालक : संचालक भारत मुद्रक आणि

प्रकाशक लिमिटेड. अ । ८ । ५५८

नारायणगुडा, हैद्राबाद–द.

# प्रकाशकाचें निवेदन

रघुनाथ यादव यांनीं लिहिलेल्या या पानिपतच्या बखरीचें हस्तलिखित स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासाचीं साधनें गोळा करीत असतां आढळलें. या चळवळीचा इतिहास लिहिण्यासाठीं जी प्रादेशिक समिति नियुक्त करण्यांत आली आहे त्या समितीचे चिटणीस श्री. सेतुमाधवराव पगडी व उत्साही सदस्य श्री. र. मु. जोशी यांनीं मराठवाडा साहित्य परिषदेच्या विद्यमानें ही बखर प्रकाशित करण्यास संमति दिली एवढेंच नव्हें तर या दोघांच्या सहाय्यामुळें व परिश्रमामुळेंच आज ही बखर प्रसिद्ध होत आहे.

आर्षविद्या व इतिहास या विषयाचे व्यासंगी अभ्यासक व इतिहाससंशोधक श्री. र. मु. जोशी एम्. ए. यांनीं या बखरीचें संपादन करून परिषदेस उपकृत केलें आहे.

श्री. सेतुमाधवराव पगडी एम्. ए., आय्. ए. एस्. यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल परिषद् त्यांची कृतज्ञ आहे.

# बखरीच्या निमित्तानें

हैदराबाद राज्यांतील स्वातंत्र्याच्या चळवळीच्या इतिहासाचीं साधनें गोळा करण्याचें काम करीत असतां, इ. स. १८५८ मध्यें कोप्पळचा किल्ला घेऊन तो इंग्रजांविरुद्ध लढवीत असता मारला गेलेला भीमराव देसाई याच्या संबंधीं खुद्द कोप्पळ येथें कांहीं कागद-पत्रें मिळतील तर पाहावें या हेतूनें मी कोप्पळचे मामलेदार श्री. लक्ष्मणराव यांच्याकडे चौकशी केली. त्याच्या उत्तरांत त्यांनीं कोप्पळच्या जवळच असलेल्या एका खेड्यांत सांपडलेल्या मोडी कागद-पत्रांचा संग्रह पाठविला. तो चाळून पाहतां भीमराव देसाई याच्यासंबंधीं कांहींच माहिती आढळली नाहीं. त्याऐवजीं पानिपतच्या बखरीचें हस्तलिखित हातीं लागलें. माझे मित्र श्री. रघुनाथ मुरलीधर जोशी यांनी ती बखर तपासून पाहिली व त्याचें संपादन करण्याचें कबूल केलें. या बखरीचें संपादन मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे होत आहे. ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. रघुनाथ यादवानें लिहिलेली पानिपतची बखर यापूर्वी इ. स. १८८५ मध्यें श्री. काशीनाथ नारायण साने यांनीं प्रसिद्ध केली होती. त्यास आज सत्तर वर्षांचा काळ लोटला आहे; व तें पुस्तक आतां दुर्मिळ झालें आहे. या दृष्टीनें कोप्पळ येथें सांपडलेली ही बखर प्रसिद्ध होण्यांत औचित्यच आहे. सान्यांनीं प्रसिद्ध केलेल्या बखरींत लक्षांत येण्यासारखा भेद आहे. त्यांवरून रघुनाथ यादवानें लिहिलेल्या मूळ बखरींत बराच फेरफार करण्यांत आला असावा असें दिसतें. विशेषतः या बखरींतील प्रादेशिक व भाषिक वैशिष्ट्यें बरींच जाणवतात. या दृष्टीनेंही ही बखर प्रसिद्ध होणें अत्यावश्यक होतें.

पानिपतचा युद्ध प्रसंग मराठ्यांच्या इतिहासांत एक अविस्मरणीय अशी घटना आहे. मोंगल साम्राज्य संपुष्टांत येत होतें, खुद्द मोंगलांचें सरदार, निजाम, अयोध्येचे नबाब, रोहिले इ. स्वतंत्र झाले होते. राज्य टिकविण्याचा जोम किंवा वकूब मोंगलांत राहिला नव्हता. त्यांतून नादिरशहाच्या स्वाऱ्यांपासून वायव्येकडून अफगाणांचे हल्ले हिंदुस्थानावर होऊं लागले. अहंमदशहा अब्दालीच्या या हल्ल्यापुढें पंजाबचा सुभा टिकूं शकला नाहीं आणि अफगाण राज्यांतील सरहद्द दिल्लीपर्यंत येऊन भिडली. अशा वेळीं मोंगल साम्राज्याच्या मदतीला कोणीच धांवत आले नाहीं, आले ते एक मराठेच. मोंगल साम्राज्यांत आपला प्रभाव

बसवून सम्राटांना आपल्या ताब्यांत ठेवून सगळ्या हिंदुस्थानांत आपला अधिकार जमवावा ही महत्त्वाकांक्षा मराठ्यांनीं बाळगली होती. मोंगलांचें साम्राज्य नष्ट करण्याचा त्यांचा कार्यक्रम नव्हता. या सुमारास दक्षिण आणि वायव्येकडून चाल करून येणारे अफ़गाण हे दोन प्रबल शत्रु भारतीयांना उत्पन्न झाले होते. या दोघांना तोंड देण्याचें महाकार्य अठराव्या शतकांत मराठ्यांनींच केलें आणि म्हणूनच भारताच्या इतिहासांत अठरावें शतक हें मराठ्यांचें शतक समजलें जातें. अफ़गाणांना पाचारण करून मुसलमानी सत्तेच्या पुनरुज्जीवनाचीं स्वप्नें पाहणारे नजीबखान रोहिला व शुजाउद्दौला यांना अफ़गाण पुरवले पण मराठे नकोत या अराष्ट्रीय भावनेनें पछाडलें होतें. ह्या उलट अफ़गाणांच्या या संकटाला तोंड देण्याकरितां आपल्या महाराष्ट्रापासून शेंकडों मैल दूर मराठे धांवून गेले आणि पानिपतच्या रणक्षेत्रावर त्यांनीं या परकीय अफ़गाणांची गांठ घेतली. शुजाउद्दौला आणि नजीबखान हे तर बोलून चालून मराठ्यांना पाण्यांत पाहणारे होते पण उत्तर हिंदुस्थानांतील इतर जमातीपैकीं रजपूत आणि जाट हे या युद्धप्रसंगांत तटस्थ राहिले. मराठ्यांना त्यांचें सहकार्य लाभलें नाहीं अशा परिस्थितींत मराठ्यांना अफ़गाणांशी सामना द्यावा लागला. वायव्येकडून पेटत आलेल्या या अफ़गाण ज्वाळेवर मराठ्यांनीं झेप घेतली व हजारों लाखों प्राणांचे बळी देऊन ती ज्वाळा त्यांनीं शांत केली. पतंग जळून मरावेत पण त्यामुळें दिवाहि विझावा तसाच प्रकार पानिपत येथें झाला. कारण पानिपतनंतर झालेल्या घडामोडींत पंजाबांतील शिखांचा उदय झाल्यामुळें अफ़गाणांची दक्षिणेकडील वाट रोखली गेली व अफ़गाणांचें भारतीय साम्राज्याचें स्वप्न साकार होऊं शकलें नाहीं. पुढें चाळीस वर्षांनीं इंग्रज हिंदुस्थानावर आपलें स्वामित्व गाजवूं पाहात असतां दिल्लीपासून तुंगभद्रेच्या किनाऱ्यापर्यंत व गुजराथपासून ओरिसापर्यंत त्यांना निकराचा सामना कोणी दिला असेल तर तो मराठ्यांनींच होय. इ. स. १८०३ मध्यें इंग्रज–मराठ्यांचें युद्ध जुंपण्याचें वेळीं भारताचा निम्मा भाग मराठ्यांच्या ताब्यांत किंवा त्यांच्या प्रभावाखालीं होता. ही एकच गोष्ट भारताच्या इतिहासांत मराठ्यांचें महत्त्व सिद्ध करून देण्यास पुरेशी आहे.

पानिपतच्या युद्ध प्रसंगाकडे आपण याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. या युद्धांत मराठे हरले परंतु ते भारतीयांसाठीं भारत व भारतासाठीं भारतीय या तत्त्वासाठीं लढले. त्यांच्या अपजयाचीं अनेक कारणें शोधून काढतां येऊं शकतात पण तो प्रश्न महत्त्वाचा नाहीं. मराठ्यांची राष्ट्रीय दृष्टि पानिपतावर

त्यांनीं गाजविलेलें शौर्य, प्रत्यक्ष मृत्यु डोळयांसमोर असतां तिळमात्रहि न डग-मगतां त्यांनीं केलेलें रणकंदन, ही मराठयांच्याच काय, भारताच्या इतिहासांतील अभिमानाची घटना आहे. अद्यापहि महाराष्ट्रांत हजारों कुटुंबें अशीं सांपडतील कीं जीं आमच्या घराण्यांतील मनुष्य पानिपतवर कामावर आला असें अभिमानानें व गर्वानें सांगतील. स्वतंत्र भारतांतील नागरिकांना पानिपतमागील राष्ट्रीय दृष्टि व पानिपतवरील मराठयांचा निर्धार हीं नेहमींच स्फूर्ति देत राहतील. या प्रसंगावर अनेक बखरी, कैफियती व इतिहास लिहिले गेले. त्यांतच रघुनाथ यादवाची ही बखर होय. अस्सल ऐतिहासिक साधन म्हणून या बखरीचें महत्त्व तितकेसें नाहीं. हें कोणीहि सांगूं शकेल; पण तत्कालीन महाराष्ट्रांत या युद्धाकडे पाहण्याची कोणती दृष्टि होती हें अशा बखरीवरून उत्तम रीतीनें समजून येईल. भाऊसाहेब, विश्वासराव, जनकोजी शिंदे, इब्राहिमखान गारदी, बळवंतराव मेहेंदळे इ. नरवीरांच्या संबंधीं जे कौतुकाचे उद्‌गार या बखरींतून दिसतात, यावरून महाराष्ट्रांत लोक या वीरांकडे कोणत्या दृष्टीनें पाहात होते हें दिसून येईल.

मराठवाडयांत औरंगाबाद जिल्ह्यांत जाफराबाद येथें इ. स. १८०२ च्या सुमारास लिहिली गेलेली पानिपतची लहानशी बखर उपलब्ध झाली आहे. तिचा कांहीं भाग प्रतिष्ठान मासिकांत प्रसिद्ध करण्यांत आला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेनें संशोधनात्मक वाङ्मय प्रसिद्ध करण्याचा जो उपक्रम केला आहे तो अभिनंदनीय आहे. बखरीच्या ह्या प्रकाशनाचें महाराष्ट्रांत स्वागत होईल अशी आशा आहे.

| | |
|---|---|
| प्रिया–विलास | सेतुमाधवराव पगडी |
| नल्लाकुंटा | एम्. ए., आय्. ए. एस्. |
| ता. १४– डिसेंबर १९५५ | गृहसचिव–हैदराबाद–राज्य. |

# पानिपतची बखर

## थोडेसें प्रास्ताविक

मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे ही पानिपतची बखर प्रसिद्ध करीत असतांना आम्हाला आनंद होत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर म. सा. परिषदेनें लक्षणीय कार्य करण्यास सुरवात केली आहे. मराठी भाषा आणि वाङमय यांचें संशोधन, संकलन, सुस्थितीकरण असें अनेकविध कार्य एकदम सुरू केलें आहे. 'प्रतिष्ठान' नांवाचें एक मासिक मुखपत्र चालवलें आहे. सृजनशील साहित्यिकांच्या निरुद्ध स्फूर्तींचे प्रवाह या नियतकालिकाच्या द्वारें डौलानें खळाळत आहेत. उपेक्षिलया गेलेल्या मातृभाषेचा यथाशास्त्र प्रसार व्हावा म्हणून परीक्षा घेतल्या जात आहेत. या अनेकविध कार्यांतला एक दुवा या दृष्टीनें या प्रकाशनाकडे बघावें.

पुणें, मुंबई व नागपूर या भागांत मराठेशाही नष्ट झाली व आंग्लाई आली त्या वेळीं महाराष्ट्रीयांच्या जीवनविषयक दृष्टींत बदल झाला. अनेक अदूरदृष्टि लोकांना नवी शिस्त, सुस्थिरता आणि न्यायीपणा यांचें अवलोकन करून प्रथमतः दिपल्यासारखें वाटलें. परंतु मराठेशाहीच्या नाशामुळें स्वत्वाचा अभिमान असलेल्या अनेक विचारी माणसाच्या अन्तःकरणाला क्षतें पडलीं, आणि त्या जखमांचा वारसा पुढल्या पिढयांच्या हृदयांतहि ठाण मांडून राहिला. राजनीतिकुशल इंग्रजांनीं मराठयांचा इतिहास प्रसिद्ध केला परंतु त्यामुळें स्वाभिमानी महाराष्ट्रीयांचें समाधान होण्याऐवजीं त्यांचा असंतोष व दुःखें अधिक खोल व तीव्र बनलीं. ग्यांट डफनें मराठयांचा इतिहास लिहिला. त्याला सर्व साधनांची अनुकूलता होती. परंतु इतिहासलेखनांतील त्याचा हेतु निराळा असल्यामुळें महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणावर त्या इतिहासाचा, लेखकाच्या अपेक्षेपेक्षां विपरीत परिणाम झाला. नीलकंठ जनार्दन कीर्तने (१८४४ – १८९६) यांनीं ग्यांट डफच्या इतिहासांतील कावा ओळखला आणि सणसणीत टीका

प्रसिद्ध केली. हे देवास संस्थानचे दिवाण होते.त्यांना ग्र्यान्ट डफच्या इतिहासाची टीका करतांना कांहीं तरी बंधनें पाळावीं लागलीं. परंतु इतिहासमहर्षि वि. का. राजवाडे (१८६३–१९२६) यांनी ग्र्यान्ट डफच्या इतिहासाचें मूल्यमापन कसें केलें आहे तें पाहण्यासारखें आहे. या इतिहासाला कीर्तने "मराठ्यांच्या मोहिमांचा इतिहास" असे म्हणतात तर, राजवाडे या पुस्तकाला हें नांव शोभत नाहीं असें म्हणून "इंग्रजांना मराठ्यांची कांहीं माहिती देणाऱ्या वृत्तान्ताचें इतिहासवजा पुस्तक" असें म्हणतात. राजवाड्यांच्या पहिल्या खंडाची प्रस्तावना प्रत्येक महाराष्ट्रीयानें मननपूर्वक वाचण्यासारखी आहे.

कीर्तन्यांच्या प्रेरणेनें न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे (१८४२–१९०१) यांनीं "Rise of the Maratha Power" हें उत्कृष्ट पुस्तक प्रसिध्द केलें. या ग्रंथामुळें साऱ्या इंग्रजी भाषा जाणणाऱ्या वाचकांच्या मनांत मराठ्यांच्या इतिहासाविषयीं एक प्रकारचा दरारा उत्पन्न झाला. परंतु इतिहासलेखनामध्यें प्रत्येक विधानाला आधार पाहिजे, या सिद्धांताप्रमाणें मराठ्यांच्या इतिहासाची साधनें मिळवण्याचे प्रयत्न चालले. दत्तात्रेय बळवंत पारसनीस (१८७०–१९२६) वासुदेव वामन खरे (१८५८–१९२४), काशीनाथ नारायण साने (१८५१–१९२७), विश्वनाथ काशीनाथ राजवाडे (१८६३–१९२६), आणि दत्तोपंत आपटे (१८८१–१९४३). इत्यादि दिवंगत आणि विद्यमान पिढींतील रियासतकार गो. स. सरदेसाई, डॉ. य. खु. देशपांडे, महामहोपाध्याय द. वा. पोतदार, आणि प्राध्यापक न. र. फाटक या संशोधक विद्वानांची परंपरा उत्पन्न झाली. भारत इतिहास संशोधक मंडळ पुणें, राजवाडे संशोधन मंदिर धुळे, शारदाश्रम, यवतमाळ आदि संस्था स्थापन झाल्या. इतिहास संग्रह, भारत इतिहास संशोधक मंडळाचे "त्रैमासिक", धुळ्याचे "संशोधक", आदि नियतकालिकें निघालीं. राजवाडे, खरे, सरदेसाई यांची दशकांनीं ज्यांची गणना करता येईल अशीं अस्सल कागदपत्रांचीं पुस्तकें प्रसिध्द झालीं. विष्णु कृष्ण चिपळूणकर (१८५०–१८८२), लोकमान्य टिळक (१८५६–१९२०), शिवराम महादेव परांजपे (१८६४–१९२९) व नरसिंह चिंतामण केळकर (१८७२–१९४७) यांनीं सुप्त झालेल्या महाराष्ट्रीयांच्या मनाला जागृतीचे फुंकर घातले. त्यामुळें महाराष्ट्रामध्यें सुशिक्षितांच्या अंतःकरणांत स्वदेश, स्वभाषा आणि स्वसंस्कृतिविषयीं एकप्रकारची बाळसेदार निष्ठा उत्पन्न झाली. परंतु आमच्या मराठवाड्यांत सुशिक्षितांचा म्हणून जो अल्पसंख्य वर्ग तयार

झाला तो या सर्व सद्भावनांपासून विन्मुख आणि ज्ञानकिरणांपासून 'असूर्यं-पश्यः' असाच राहिला.

उस्मानिया विद्यापीठाच्या स्थापनेपूर्वी जे जे महाराष्ट्रीय सुशिक्षित व पदवीधर बनले ते पुणें, मुंबई, नागपूर इकडील कॉलेजांतून शिक्षण घेऊन आले. त्यांतील एखाद दुसऱ्या पदवीधराला ऐतिहासिक संशोधनाची चटक लागली असली तरी अर्थार्जन व जीवनोपयोगी व्यवसाय यामुळें त्या तळमळीचा विकास होऊं शकला नाहीं. उस्मानिया विद्यापीठानें गेल्या २५–३० वर्षांत अनेक महाराष्ट्रीय पदवीधर निर्माण केले. मराठी भाषा व साहित्य यांच्या अभ्यासाची सोय केली. परंतु मराठ्यांच्या इतिहासाची आस्था निर्माण होण्यास विश्वविद्यालयाचें वातावरणच विसंवादी होतें. मराठ्यांच्या स्थूल इतिहासाला-सुध्दां मानाचें स्थान नव्हतें. मग त्यांतील बारकाया, खाचाखोचा यांच्या-बद्दलच्या साधार विवेचनाचा प्रश्नच उपस्थित होण्यासारखा नव्हता.

ही वरील गोष्ट प्रामुख्यानें सांगण्याचा उद्देश असा कीं मराठी वाङ्मया-मध्यें इतिहासाचे आधारग्रंथ आणि ऐतिहासिक संशोधनविषयक चर्चेचें एवढें समृध्द वाङमय निर्माण झालें आहे कीं तें शुध्द इतिहासाभ्यासु आणि शुध्द साहित्याभ्यासु या दोन्ही प्रकारच्या व्यक्तींच्या कक्षेंत येत नाहीं. मराठी भाषेचा अभ्यास, या दृष्टीनें गं. ब. ग्रामोपाध्ये यांचा " मराठी भाषेचें स्वरूप " हा पेशवेकालीन मराठीवरील विमर्शात्मक ग्रंथ परिचयाचा असतो. परीक्षेच्या निमित्तानें तरी जुन्या भाषेचा परिचय व्हावा म्हणून कृष्णाजी शामरावकृत 'भाऊसाहेबांची बखर' संभाजी राजाराम यांची चिटणीसकृत चरित्रें, अथवा ऐतिहासिक पत्र-बोध अशीं पुस्तकें असतात परंतु यांचा अभ्यास कसातरी करून पदवी पकडण्याची पळवाट म्हणूनच यांच्याकडे बघितलें जातें. राज-वाड्यांसारख्या तेजस्वी प्रज्ञावन्ताच्या साहित्याचा परिचय होत नाहीं तोंपर्यंत कोणत्या निष्ठेनें मराठ्यांच्या इतिहासाकडे व इतिहास संशोधनाकडे पहावें हें उमगत नाहीं. सर जदुनाथ सरकारसारख्या अव्वल दर्जाच्या चिकित्सक इति-हासाचार्यांनीं राजवाड्यांबद्दल काय म्हटलें आहे तें पहा. "The greatest discoverer, the life-long searcher, the exclusive devotee without a second love, the most fruitful collector of the raw materials of Maratha history and at the same time their most painstaking (if occasionally inexact or perverse) editor and their most speed

and prolific publisher has been lost to us for ever. Time may bring forth others to carry on his work; but they will be merely a tamer race of the after born scanty gleaners after his copious harvest; not one of them will devote–as Rajwade devoted-all thoughts all passions, all interests of a long mateless professionless life to the ceaseless exploration of all possible and impossible "Find Spots" of historical records, amidst hopelessly defective means of transport, discomfort, privation and lack of helpers ·in the teeth of ignorant suspicion and hostility, neglect and inertia from a local public, whom he had to humour coax, educate and when necessary delude."

या प्रकार कर्मयोगाच्या जोडीला राजवाड्यामध्यें आढळून येणारा भारतीय आणि महाराष्ट्रीय संस्कृतीकडे बघण्याचा द्रष्टेपणा हा मराठवाड्यांतील सुशिक्षितांच्या जितक्या उत्कट परिचयाचा होईल तितका तितका तो अधिकाधिक होणें जरूर आहे. या पानिपतच्या बखरीचें प्रकाशन मुख्यतः मराठवाड्यांतील वाचकवर्ग दृष्टीसमोर ठेवूनच करण्याचें ठरवलें आहे.

ज्या अभूतपूर्व पद्धतीनें भारतवर्षाला स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे तिचा साधार व अधिकृत इतिहास लिहिला जावा म्हणून सर्व प्रांतांत व राज्यांत संकलन समित्या नियुक्त केल्या गेल्या आहेत. आपल्या हैदराबाद राज्यांत जी समिति स्थापन झाली आहे तिचे संयोजक श्री. सेतुमाधवराव पगडी एम्. ए., आय. ए. एस्. यांना आधार मिळविण्याचें काम चालू असतां कोप्पळ तालुक्यांतून मोडी कागदपत्रांचा एक संग्रह मिळाला. त्यांच्या या समितीच्या कार्यांत आम्हीहि त्यांचे एक सहकारी असल्यामुळें त्यांनीं तो संग्रह ऐतिहासिक मूल्यमापनासाठीं आमच्याकडे पाठवला. त्या संग्रहामध्यें ही बखर आढळली. ती प्रसिद्ध करण्याची त्यांनीं अनुज्ञा दिली व मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. रामकृष्णपंत माडेकर एम्. ए. यानीं परिषदेतर्फे हें प्रकाशन करवलें याबद्दल या दोन्ही मित्रांचे आम्ही ऋणी आहों.

पानिपतच्या युद्धाचें वर्णन देणारीं साधनें मराठी, फारसी, हिंदी आणि

पर्यायानें इंग्रजींतसुद्धां उपलब्ध आहेत. पण मुख्यत: पानिपतचेंच वर्णन देणाऱ्या ज्या बखरी आहेत त्यांमध्यें कृष्णाजी शामराव विरचित "भाऊसाहेबांची बखर" या पुस्तकाला फार मानाचें स्थान आहे. या बखरीचा विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत मधून मधून समावेश झाल्यामुळें हिच्या सहासात आवृत्त्या निघाल्या आहेत. भा. इ. सं. मंडळातर्फे ऐतिहासिक कागदांचे आधार देऊन या बखरीची एक नवी आवृत्ति निघाली आहे "श्रीमंत भाऊसाहेबांची कैफियत" नांवाची एक बखर आहे, ही इ. स. १८८७ सालीं प्रसिद्ध झाली आहे. "होळकरांची कैफियत" इ. स. १८८६ सालीं प्रसिध्द झाली. त्यानंतर स्वतंत्र अशी पानिपतची बखर म्हणजे रघुनाथ यादवांची बखर होय. ही का. ना. साने यांनीं इ. स. १८८५ सालीं प्रसिध्द केली. या रघुनाथ यादव चित्रगुप्ताचा (१७०८–१७७०) आम्ही प्रसिध्द करीत असलेल्या बखरीशीं निकटचा संबंध आहे. चित्रगुप्ताच्या या बखरीबद्दल राजवाडे म्हणतात, "रघुनाथ यादवकृत" "पानिपतची बखर" ही मोठ्या कसोशीनें पारखून घेतली पाहिजे. ही बखर शके १६८४ चित्रभानु संवत्सरे फाल्गुन शु॥ ५ ला मंदवारीं पुणें येथें संपवली म्हणून रघुनाथ यादव म्हणतो. परंतु फाल्गुन शु॥ ५ ला मंदवार नसून शुक्रवारच आहे. त्या अर्थी मितीवर विश्वास ठेववत नाहीं."

आमच्या बखरीचीं (९"×७") एकूण २४० पृष्ठें आहेत. पहिल्या पानावरचें मोडी अक्षर बारीक लेखणीचें विराळया वळणाचें आहे. नंतरचीं पानें मोठ्या लेखणीनें लिहिलेलीं डौलदार मोडी वळणाचीं आहेत. पुढील एकटाकी मजकुरांतलें पहिलें पान जीर्ण झालेलें किंचित् फाटलेलें अलग बऱ्याच दिवसांनंतर दप्तरांतच सांपडलें. भिन्न अक्षरांतल्या पहिल्या मजकुरांत रघुनाथराव चित्रगुप्त यानें दौलतराव हिंदुराव घोरपडे यांच्यासाठीं लिहिलेली ही बखर आहे असें म्हटलें आहे. त्यावरून लेखकाच्या कर्तृत्वाबद्दल संशय होता तो मूळ पान मिळाल्यावर दूर झाला. का. ना. साने यांनीं ७० वर्षांपूर्वी छापलेली जी बखर आहे तोहि अतिशय दुर्मिळ झाली आहे. त्यामुळें मुळाशीं ही हस्तलिखित प्रत ताडून पाहणें फारच कठीण होऊन बसलें होतें.

रघुनाथ यादव चित्रे हा एक प्रसिध्द बखरकार आहे. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांनीं संशयावरून ज्याचा निष्कारण बळी घेतला तो बाळाजी आवजी चित्रे हा या रघुनाथ यादवाचा चुलत आजा होता. कोल्हापूरकरांच्या दरबारांत रघुनाथ यादवाला थोडी प्रतिष्ठा मिळाली होती. हा जुन्या माहितीवरून बखरी लिही. याचें आडनांव चित्रे परंतु त्यानें

त्याचें चित्रगुप्त बनवून यमधर्माच्या चित्रगुप्ताशीं आपली स्पर्धा असल्याचें सूचित केलें आहे. यानें लिहिलेल्या पानिपतच्या बखरीच्या अनेक हस्तलिखित नकला झाल्या असाव्यात असें दिसतें. मुद्रणाच्या सोयीपूर्वी हाच एक मार्ग मोकळा होता. सान्यांना बखर छापण्यापूर्वी चार प्रति उपलब्ध झाल्या होत्या. प्रत्येकींत थोडेफार पाठभेद होतेच असें त्यांनीं नमूद केलें आहे. आमची बखर दौलतराव हिंदुराव घोरपडे यांच्यासाठीं लिहिलेली आणि कुकनूर येथील कोनेर गौडा यांच्या प्रेरणेनें कांहीं महत्त्वाचे फरक करून लिहिलेली दिसते. या आमच्या बखरीच्या कापडानें पुष्ट बनविलेल्या मलपृष्ठावर जुन्या मोडी अक्षरांत असा मजकूर आहे : "भाऊसाहेब व रघुनाथराव पेशवे यांनीं खतल जाहले सन ११७० फसली. हे किताबचे मालक देवराव गौडा फर्जंद अनंतराव गौडा राहणार कुकनूर तालुके हलबुर्गा जिल्हा कोपल निजाम सरकार १२४३ फसली." हे दौलतराव हिंदुराव घोरपडे आणि "ऐतिहासिक पत्रव्यवहार" या आधारग्रंथांत क्रमांक २५५ चें २१ सप्टेंबर १७८६ चें नाना फडणीसांना पत्र लिहिणारे दौलतराव हिंदुराव घोरपडे एकच असावेत. हे घोरपडे पानिपतच्या युद्धांत समक्ष उपस्थित होते असें दिसतें.

या आमच्या बखरीचें प्रादेशिक वैशिष्टय असें आहे कीं यांत प्रारंभीं आलेला ऐतिहासिक मजकूर अन्य कोठें येणें शक्य नाहीं. सान्यांच्या बखरींत तसा तो आलाहि नाहीं. पेशवे आणि निजाम यांचे ऐतिहासिक संबंध कसे होते हें प्रसिद्ध आहे. निजामुलमुल्काचा नातु मुजफ्फरजंग हा हैद्राबादेच्या सुभेदारीचा आपण हक्कदार वारस आहों असें मानी. हा १७५१ च्या जानेवारींत मारला गेला. याच्याच नांवाचा मुजफ्फरखा नांवाचा एक गारदी सरदार होता. हैदरजंग नांवाचा एक बूसीचा दुभाषा होता. हा सलाबतजंग व निजामअलीखां यांना शत्रूसारखा वाटे. फरेंच सरदार बूसी काय म्हणतो व काय समजतो हें यांना हैदरजंगामार्फत कळे. यामुळें हैदरजंगाला निजामअलीखां व विठ्ठल सुंदर प्रतापवंत यांनीं ठार केलें हा उल्लेख सनपुरी बखरींत आला आहे. मध्यवर्ती अभिलेख कार्यालय, हैद्राबाद या खात्यानें ही बखर सन १९५० सालीं प्रसिद्ध केली आहे. या हैदरजंगाच्या नांवासारखें नांव असलेला मुजफ्फरखान गारद्याचा एक मेव्हणा होता. त्याचें नांव हैदरखान असें होतें. या हैदरखानानें मुजफ्फरखानाच्या चिथावणीवरून १७५९ सालीं भाऊसाहेबावर प्राणघातक हल्ला करवला, पण भाऊसाहेब सुदैवानें बचावले. तेव्हां मुजफ्फरजंग आणि मुजफ्फरखान व हैदरजंग आणि हैदरखान यांच्या नांवांत विपर्यास करून

मुजफ्फरजंगाच्या प्रेरणेनें हैदरजंगानें भाऊसाहेबांवर हल्ला केला व हे दोघे भागानगरकर होते असा उल्लेख केला आहे.

आमच्या बखरीचें आणखी एक वैशिष्टय आहे तें हें कीं, नाना फडणीसाचें नांव तीमध्यें कोठेंहि आढळत नाहीं. या वेळीं नानाचें वय १९ वर्षांचें होतें. विश्वासराव त्यांच्याहून पांच महिन्यांनीं वडील होते व नानाला एक तरुण पेशव्याचा बालमित्र म्हणून बरोबर ठेवलें होतें. निकराचा प्रसंग आल्यावर भाऊसाहेबांनीं युद्धाच्या आदल्या दिवशीं ज्या मंडळीशीं सल्लामसलत केली त्यामध्यें सान्यांच्या बखरींत नाना फडणीसाचाहि उल्लेख आहे. हा नामोल्लेख नानाला पुढें जें राजकीय महत्त्व प्राप्त झालें तें विचारांत घेऊन वाढवलेला आहे. पण आमच्या बखरींत नानाला विश्वासरावाचा एक रोडका बालमित्र एवढेंच मानलें गेलें असावें असें स्पष्ट दिसतें.

आमच्या बखरीचा शेवटहि सान्यांच्या बखरीपेक्षां निराळ्या तऱ्हेनें झाला आहे. १४ जानेवारी १७६१ हा जो युद्धाचा शेवटला दिवस त्या दिवशीं प्रातःकालीं विश्वासराव व भाऊसाहेब यथाविधी स्नानसंध्यापूजादि अन्हिक करून सालंकृत आणि सायुध महान् राष्ट्रीय कर्मयज्ञ करण्याकरतां निघाले असें वर्णन करून त्यांचें पुढें काय झालें हें हृदयद्रावक ऐतिहासिक सत्य विषद केलें नाहीं. अशा तऱ्हेचा शेवट केल्यामुळें बखरीला एकप्रकारची अनैतिहासिकता प्राप्त झाली असली तरी निराळ्या दृष्टीनें आमच्या मतें भावनामनोहर अशी काव्यमय कमनीयता आली आहे. येथून पुढील मजकुराचीं पानें गहाळ झालीं आहेत असें म्हणण्यासहि जागा नाहीं. कारण बखर पानांच्या मध्यावर संपवून " आज्ञाप्रमाने तयार जाहले समाप्त " अशी स्पष्ट अक्षरें आहेत. मूळ प्रसिद्ध झालेली बखर अत्यंत दुर्मिळ आणि तिच्याशीं आमच्या बखरीचे ओळींओळीला पाठभेद यामुळें अभ्यासकांना ही बखर उपलब्ध करून देणें अत्यंत आवश्यक वाटलें. सान्यांच्या बखरीचा मजकूर शाहूमहाराजापासून व शेवट विस्तारपूर्वक आहे.

खबर या शब्दाचा वर्णविपर्यय (Metathesis) बखर कीं "ख्या" या धातूला "वि" हा उपसर्ग लागून विख्या वाकया हा अरबी शब्द बनला, हें निश्चित ठरवतां येत नाहीं. पण अशा बखरी सर्व भाषांत ऐतिहासिक वृत्तांत देण्यासाठीं लिहिल्या जात- यांना ऐतिहासिक साधनें म्हणून दुय्यम प्रतीचें गौण स्थान दिलें जातें. समकालीन पत्रव्यवहाराला व घटना पाहणाऱ्या

प्रेक्षकाच्या विधानाला फार महत्त्व दिलें जातें. साधारणपणें सर्वच बखरीमध्यें काळ, स्थल व घटना यांचें विपर्यास झालेले आढळतात. याचें कारण सांगावांगी माहितीवर भर देऊन व स्मृतीवर विसंबून बखरी तयार केल्या जातात. समकालीन पत्रव्यवहाराच्या बाबतींतसुद्धां लेखकाचा वकूब पक्षाभिनिवेश व पूर्वग्रह विचारांत घेऊनच त्याचा खरेपणा तोलावयाचा असतो. पानिपतच्या वृत्तांताबद्दल मूळ फारसीमध्यें लिहिलेल्या काशीराज शिवदेवाच्या बखरीची हीच स्थिति झालेली आहे. हा काशीराज निजाम संस्थानांतला ब्राह्मण, उत्तरेंत शुजाउद्दौलाच्या दरबारांत मुत्सद्दी म्हणून काम करी – हा पानिपतच्या संग्रामांत प्रत्यक्ष हजर होता. यानें इ. स. १७८० सालीं एखाद्या जिज्ञासू इंग्रजासाठीं ही बखर तयार केली म्हणतात. हा पानिपत संग्रामसमयीं भाऊसाहेबांकडे शुजाउद्दौल्यातर्फे येतजातहि असे. याच्या वर्णनाला सर जदुनाथ सरकार फार महत्त्व देतात. " The fullest and most trust worthy source on the battle itself about which naturally no maratha dispatch is available. The fact of author being a maratha by race and creed and his presence in Abdali's camp in the train of Shuja throughout the campaign made him naturally see both sides more intimately and get information about both the camps more fully and accurately than, was possible for any other person." पण याच काशीराजाबद्दल श्री. त्र्यं. शं. शेजवलकर आपल्या पानिपत या इंग्रजी ग्रथांत काय म्हणतात तें पहा. " We suggest from this small but vital point that Kashiraj has not only forgotten the days and the proper order, but was narrating the whole story with a dramatic touch as the battle of Panipat is a good theme for such treatment. ',

प्रत्यक्ष पाहिलेल्या पुराव्याला युद्धाच्या वर्णनाच्या बाबतींत किती महत्त्व द्यायचें याची चिकित्सा करण्यासाठीं नेपोलियनसारख्या दिगंतकीर्ति योध्याला पराभूत करणाऱ्या ड्यूक ऑफ वेलिंग्टनचें काय मत आहे तें वाचा. मुळांतला मजकूर भाषान्तरानेंच सांगतों. "इंग्लंडच्या रहिवाशांना वाटरलूच्या युद्धाची अधिकृत व वास्तविक हकीकत कळण्याची जिज्ञासा असावी हें योग्य आहे

परंतु वास्तव वर्णनाच्या नांवाखालीं त्यांनीं कांहीं तरी विपरीत वृत्त वाचावें याला माझा आक्षेप आहे. परंतु प्रसिद्ध झालेले सारे वृत्तांत सदोष आणि सत्याशीं विसंगत आहेत. क्षणाक्षणाला माझ्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या सैनिकांच्या टोळ्या कशा रीतीनें स्थलांतरें व चढाई करीत होत्या हें मलाहि स्मरत नाहीं. मूळचे सरकारी अहवाल आहेतच. पण इतिहासलेखक व युद्धाचे समीक्षक यांच्यांत मात्र मतभेद आहेत. वाटरलूचें महायुद्ध झालें. एवढी एकच घटना खरी आहे. तिजबद्दल कोणतीहि माहिती देणारांत मात्र मतैक्य नाहीं. त्या युद्धाचीं इतकीं परस्पर विरुद्ध वर्णनें मी वाचलीं आहेत कीं मला स्वतःलाच एखाद्या वेळीं संशय येतो की मी या युध्दांत हजर होतों का नव्हतों. एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत जगप्रसिध्द इंग्रज व फ्रेंच विजेत्यांच्या शिस्तशीर पध्दतीनें लढणाऱ्या कवायती कंपूच्या लढाईच्या वर्णनांत वास्तवतेची ही दुर्दशा आहे !

बखरीच्या अन्तर्गत मजकुराबद्दल भाषिक दृष्टया पुढील गोष्टी विचारांत घेण्यासारख्या असतात. बाळबोध नागरी लिपीचें लेखणी न उचलतां लिहिल्यामुळें जें स्वरूप बनलें तें मोडी हें हेमाडपंतानें (१२६०–१३०९) रूढ केलें. या मोडी लेखनांत ऱ्हस्व व दीर्घ इकार व उकार सारखेच लिहितात. मोडींत सुध्दां बाराखडया शिकवतात. दहा खडया नसतात. त्यामुळें मोडीच्या नागरीकरणाच्या वेळीं आज जे शब्द शुध्द म्हणून इकारात्मक व उकारात्मक ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहितात तसेच ते आहेत असें मानलें पाहिजे. नक्की ऱ्हस्व असणारा आजचा शब्द जर दीर्घ लिहिला गेला तर ती नक्कल करणाराची चूक होय. अशा कांहीं चुका या बखरीच्या नागरीकरणांत झाल्या आहेत. त्या सुधारून वाचाव्यात अशी वाचकांना विनंती आहे. विरामचिन्हें मुळांत नसल्यामुळें घातलीं नाहीत. पण त्यामुळें अर्थबोधाला कोठेंच व्यत्यय येत नाहीं. अनुस्वारांच्या बाबतींत बखरकार फार कृपण आहे. जेथें स्पष्ट उच्चार करण्यासाठीं अनुस्वारांची आवश्यकता आहे तेथेंहि तो ते देत नाहीं तर मग अनुच्चारित अनुस्वार, शुध्दलेखनाचा दंडक म्हणून तो कोठून पाळणार? बखरकारांची शैली संस्कृत शब्दप्रचुर वर्णनाच्या विविधतेनें आणि साहित्यिक दृष्टीनें रसाळ बनली आहे. सर्व सरदारांनीं भाऊसाहेबांना ज्या वेळीं विनती केली कीं आतां क्षणाचाहि विलंब करून युध्द लांबवणें म्हणजे धारातीर्थीं कंठस्नान करून स्वर्गांगनांच्या आलिंगनांत पडणाऱ्या योध्यांना अक्षम्य दशेनें मृत्युमुखीं लोटून वरकवास घडवणें आहे. त्या वेळचें सरदारांचें भाषण, विश्वास-

राव व भाऊसाहेबांचा संवाद या संहितेंत अतिशय रमणीय पद्धतीनें व्यक्त झाला आहे. व्याकरणाच्या दृष्टीनें विचार करतां लेखकाचा लिंगनिर्णय जरासा स्खलनशील वाटतो. पुष्कळशा शब्दांना स्त्रीलिंगी मानण्याकडे त्याचा कल आहे.

बखरींत ११७० फसली व दुसरा १२४७ फसली असा सालांचा उल्लेख आहे. पहिला इ. स. १७६१ असून तो भाऊसाहेबांच्या मृत्यूचा आहे, दुसरा १८३२ इसवी हा देवराज गौडाच्या हातांत बखर आली तेव्हांचा आहे. तेव्हां ही जुनी बखर ६०-७० वर्षे कोणाच्या तरी वाचनांत असावी.

या बखरीचा मुख्य इतिहास पानिपतचें युद्ध याविषयीं अनेक प्रथित-यश इतिहासलेखकांचीं वर्णनें व मतें आहेत. श्री. त्र्यं. शं. शेजवलकरांचें पानिपत हें पुस्तक या दृष्टीनें अद्यावत् आहे. साऱ्या ऐतिहासिक घटनांचे विकास-करम अंदाजून आपली कांहीं विमर्शात्मक पुस्ती जोडावी आणि प्रकाशनाचें महत्व वाढवावें अशी आम्ही श्री. सेतुमाधवरावांना विनंती केली आणि ती त्यांनीं मानली हें त्यांच्या सौजन्याला साजेसें आहे. प्रारंभीं निराळा मजकूर व विषय देणारी, शेवट निराळ्या पद्धतीनें काव्यमय करणारी व ओळीओळीस पाठभेद दाखवणारी ही एक स्वतंत्रच बखर मानायला हरकत नाहीं. इतिशम् ।

रघुनाथ मुरलीधर जोशी एम्. ए.
संपादक

॥ श्री ॥

श्रीमंत महाराज दौलतराव हिंदुराव घोरपडे मंलकत मदार[1] स्वामी रावसाहेबाचे शेवेसी विनंती रघुनाथराव चित्रगुप्त दिमंत[2] राजमंदिर कृतानेक विज्ञापना: तागायेत छ २६ माहे माहरम सन ११७० फसली परियेत साहेबाचे कृपे कटाक्षाकडून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष उतर प्रांती राजेश्री सदासिवपंत भाऊ व विश्वासराव पेशवे सैनासमोह[3] सुधा जाउन अबदालअली ईरानीस युध्धप्रसंगी विक्रमनाम संवछर अरबी सन इहिदे[4] सितैन[5] मया[6] व अलफसाली[7] जाहला. (७) कुरुक्षेत्राचे स्थली उभयेतामध्धें जाहले कलयुगी त्याची उपमा नाहि जाहले त्याचे युध्घ आपले पृथवींत विख्यात जाहली.

(८) श्रीमंत महाराज दौलतराव हिंदुराव घोरपडे मंलकतमदार (का. फा.) साहेबाचे शेवसी

विनंती शेवेसी रघुनाथराव चित्रगुप्त दिमंत शेवेसी राजमदिर कृतानेक विज्ञापना: तागायत छ २६ माहे मोहरम सन ११७० फसली पर्यंत साहेबाचे कृपेकटाक्षाकडून शेवकाचे वर्तमान यथास्थित (९) असे विशेष उतर प्रांती राजश्री सदासिवपंत भाऊ व विश्वास-

---

१. राज्याधार, एक किताब (फा). २. सेवा, स्वाधीन (अ). ३. सैन्य समूह (सं). ४. ५. ६. ७. एक, साठ, शंभर, एक हजार. अकरार्शे एक षष्ट हाशुहूर सन अरबी काल गणनेचा आहे. हा सौर असल्यानें ठरलेले महिने ठरलेल्या ऋतूंत येतात. यांत सहाशे मिसळले कीं इ. स. निघतो.

राव पेशवे सैनासमोह सुधा जाऊन आबदाल आली इंरानीस युध्ध प्रसंग विक्रम नाम संवछर आरबी सन इहिदे सितैन मया व आलफ साली जाहाला कुरुक्षेत्राचे स्थली उभयेता (का. फा.) ले कलयुगी (का.फा.) उपमानाही जा(का.फा.) चे युध्ध आपले पृथ्वी (१०)त विख्यात जाहली ते साहेबासीं विदित व्हावे या करिता शेवेसी विनंति लिहिली आहे साहेबी अवकाश[1] करून सावध चिती श्रवण कराव अैस पराक्रम षडश्वर्य[2] संपन्न पराक्रमी कर्मनिष्ठ जेगत्यांत समर्थ कीर्तीवंत जाहाला ते सत्यवचेन माधुर्य गोब्राम्हणाचे ठाई परम विश्वास भगवद् भक्ती (११) आद्वितीय श्रीमंत राजश्री नानासाहेब पंतप्रधान व भाऊसाहेब पेशवे भूमंडली मानवी अवतार धरून शेतू-पासून हिमाचेलपर्यंत पराक्रम करून संपूर्ण पृथ्वीच जेय संपादून कितेक दुष्टचे तुष्ट शेत्रूच निर्दलन कराव हे सिध्धता करून ईरानी तुरानी व रूमशाम राज्य (१२) हस्तगत कराव हेच उमेद भाउसाहेबाची असे असता ईरानीयाणी आटकपार होऊन आला त्यास नतीजा पोहचवावे याजकरिता राजश्री सदासिवपंत भाऊ व राजश्री विश्वास-राव याची रवानगी पुण्याहुन श्रीमंत पंतप्रधान याणी सुमुहूर्ते मुळा मुठाच्या संगमी डेरे दिल्हे उतर रोखे (१३) मुकाम केले समागमे प्रमुख्य सरदार नेमिले ते राजश्री मलहारजी होळकर व जेनकोजी सिंदे व दमाजी गाइकवाड व संताजी पोवार व रामराव देवकांते व सयाजी रणनवर व गोविदपंत बुदले व त्र्येंबकराव सदासिव पुरंधर व सोनजी पदकार विठल सिवदेव व उदाजी रणनवर (१४) व गोविंदपंत व आपाजी जाधव व संताजी आठवले व नारायेणराव सोनकर व रघोजी पोवार व नरसिंगराव भिडवे मानसिंगराव बडव्या व नारोजी निंबालकर व हणमंतराव मोहिते व त्र्येंबकराव विनायेक त्याची पुत्र बलवंतराव त्र्येंबक. सयाजी बडगर व आनंद-राव पोवार व (१५) लिंगोजी नारायेण व विसाजी रुद्र व येशवंत-

---

१. शांतपणें (सं). २. षडैश्वर्य, संधि, विग्रह, यान, आसन द्वैधीभाव, समाश्रय हीं राजनीतीचीं मुख्य अंगें असलेलें.

राव माधव विंचूरकर वगैरे लहानथोर सरदार पुण्यची बंदोबस्तीस श्रीमंत नानासाहेब याच बरोबर शाहारात राहिलेले खेरीज करून सदरी लिहिलेप्रमाणे फौजेच गाहा[1] करून पीतर[2] उल्हासानी मध्ये-भागी मुकाम भाऊसाहेबाच जाहला नबाब (१६) मुसफरजेंग बाहा-दर भागानगरकर याणी जातीनिसी कितेक राजकारणाची मसलत करून दग्या ने कितेकासी ठिकाण लाऊन दौलत आपण करावे असे भाव धरून आपला जामात[3] हमेशा पेशवे याच्या दरबारी राहात होते त्यास भेद करून राजश्री भाउसाहेब यास मारावे अैसे निश्चय करून त्यास बक्षिस करून नबाब मुस. (१७) फरजेंग याणी आपल्या ज्यामातास आज्ञा केली त्याणे पीतर[4] उल्हासानी मुक्कामी संधी पाहून मार्गसीरष शुक्ल प्रतिपदा माध्यानकाली मिर्जा महमद बेग याच्या डेऱ्यात राहाउन मज्यालसी[4] मध्येभागी राजश्री भाऊसाहेब व समोहदिक[5] बलवंत गणपत व नारोपंत पाणदेव व महिपतराव चिटनीस (१८) व नारायेण नाईक व कितियेक मर्दान सदर बारगीर[6] व खिजमतगार[7] पंनास साठीनिसी कचेरीत होते त्या वेली अंगीज[8] करून आपल्या जीवास उदक सोडून नीट चालोन महिपतराव चिटनीस याच्या सरद्यावर[9] हात देऊन भाउसाहेबावर कठार चालविली इतक्यांत महिपतराव याणी युक्तीने त्यास पा (१९) ठीमाग घातला भाऊसाहेब पुंण्येश्लोक तशा यवनाच्या स्पर्शे करून काय होहील आरिष्ठ आलेले श्रीहरीने पराभव केला हे वर्तमान श्रीमंत नानासाहेब यैकोन उत्कर्ष्टे दानधर्म करू लागल ते काही संख्या लिहिता पुरवेना दुसरे दिवसी लहान (२०) थोर सर-दार यास आणऊन विच्यार केला सर्वत्राच्या बोलण्यावरून ही गोष्ट मुसफरजेंगावर लागूं होहील आसे युक्तीने ठराव केले भाउसाहेबाच

---

१. स्याव, एकत्र करून. २. स्पष्टीकरण न करतां येणारा हा शब्द आहे. स्थळ वाचक असावा. ३. जावई. ४. अर्थ दोन प्रमाणें. ५. इतर मंडळी पैकीं. ६. धन्यानें दिलेला घोडा ठेवणारा शिपाई (फा). ७. परिचारक, सेवक(फा). ८. धाडस, उठावणी (फा). ९. सदऱ्यावर कीं काय?

मनोनिश्चेये मुसफरजेंग व हैदरजेंग सरदार माकुल[१] हे कर्म त्याजकडून कसे होईल पिछालागून शासन (२१) केलिया लौकिकी विरोध समजोन हे कर्म कोणाकडून जाहाला हे विच्यार अंतरगी शोध करीत असताना कठार चालविला तो येवनास कैद केले होते येकायेकी सांगू लागला जे हे कर्म माझ बुधीपूर्वक घडली नाही मुसफरजेंगाची आज्ञावरून निरोपाय (२२) कर्म केला म्हणोन मुसफरजेंग याच दस्ताऐवज[२] फरसी कागद[३] त्याची सिकानिसी आणोन देताच भाउसाहेब यास जखम लागली होती हे वर्तमान श्रीमत नानासाहेब याणी यैकोन कृतांताप्रमाणे क्रोधतप्त होऊन तमाम सरदार लोकास फौज (२३) तयार करवाऊन पाठऊन मुसफरजेंगाच्या ज्यामात हैदरजंग व मुसफरजंग सरदार हैदरजेंग दकर[४] नवाबाचे समधिक पुण्यास चाकरीस होते त्यास धरून आणऊन सिरछेद करविले दोघाच मालियत मिलोन निवल पचेविस लाख रुपयाचा त्याची सरंजाम (२४) सरकारात लागली जडजवाहीर दागिने बहूत आपूर्व त्याची सापडली त्याची कबीलास[५] सिव्हगडावर नेहून ठेवले. ते यवनास इतका शसन केल्यानंतर श्रीमंत नानासाहेब व भाउसाहेब उभयताच क्रोधाची शांतता जहाली पुढे मसलततीनी दि (२५) वसानतर तेथून कुच दर मजल चालोन भाऊसाहेब विश्वासराव फौजेसुधा आमदानगरास गेले किला बहुत कुबल[६] सामान सरंजाम भारी मोगलाई ठाणा. असता भाउसाहेब व विश्वासराब खस्त[७] करून किला घेतले हे वर्तमान लौकिकी विख्यात जाहले जागा कुबल (२६) कोणासीही हस्तगत व्हावे याच नव्हते सहजात घेतले याच प्रकारे नवाब सलाबत जंग यासी भागानगरास वर्तमान कळोन बहुत विस्मित पाहोन आंदेशात पडला की मराठे सर्व रांज्ये हस्तगत केले पादशाई शासन मोडित चालिले

---

१. जाणता, शाहाणा, समर्थ (अ). २. हस्तलिखित, प्रमाण पत्र (फा). ३. फारसी. ४. हैदराबादकर कीं काय. ५. परिवार (अ). ६. दुर्गम, मजबूत व अवघड बांधणीचा (फा). ७. चिकाटीनें, जीवलावून, तन्मयतेनें (फा)

अनुचित गोष्ठ जाहली असे (२७) ध्यानात आणोन तमाम आमीर उमराव समोदिक सरदार व दिवाण सर्वत्र मंडलीस अणउन मसलत आरभिली सर्वत्रास बोलो लागला की इत:पर युक्तीच काम नाही फौजेचा गाहा करून नीट चालोन जुजाव[1] तखतया ताबूत या शिवाय आन्ये योचना किमपि नाही अस निश्चय (२८) करून चाळीस पंनास हजार फौज व तोफभारी तीनीशेहे जंबुरे[2] व रेखले[3] व जेंजाले[4] व सुरतर[5] नाला[6] व इतरनाला[7] व गरनाला[8] व बाण व गुंडगोले[9] व फिस्तोल वगैरे या प्रमाणे सिवाये दारू गोल्या खेरीज सामान पुढे केले फौजा पठान व रोहिले व कायते[10] व परदेशी व मागले[11] व मराठे व पाळेगार[12] व किरात[13] व सुरपूर नाईक व मातुलसुधा[14] सलमुलाखा[15] व निजामनमुलकच नवाब याचा जावई भागानगरकर व मैंद व बेदरवाले व सिकाकाले राजमईद्र पूर्व समुद्रपासून आवरंगाबादपर्यंत तमाम सरदार याणी आणवली तमाम गाहा (३०) केले फौजा घौडदलसाठी हजार यक लाख पायदल चाळीस हजार पठान खेरीज करून तोफखाना सामान मातबर[16] जाहाल तदनंतर सुमुहूर्ताने बाहिर निघोन दरमजल कूच करून स्वराज्यातील शेत्रूची ठाणी उठउन आपली ठाणी बसविली भाऊ (३१) साहेब याच्या सैनास व अमित्राच्या[17] फौजेस वीस कोसाची तफावत राहिली दोही फौजाची लुटवणी[18] खाली मुलुक अमित्राची बेचिराख जाली तेव्हा राजश्री सदासिवपंत भाऊ व विश्वासराव याणी तमाम सरदारासी आणविले. जुजाची[19] म(३२)

---

१. युद्धकरावें, मरावें किंवा राज्याकरावें. २. उंटावरील तोफ. (फ.) ३. छकडा, बंदुकी सारखें हत्यार, सुरुंग लावून खडक फोडण्याचें साधन (हिं) ४. फिरवता येण्यासारखी लांब नळीची बंदूक. ५. ६. उंटावरून मारण्याच्या तोफा. ७. इतर नळयांच्या तोफा. ८. लाकडी उखळी सारख्या आखुड व रुंद तोफा. ९. दगडी गोटे फेंकण्याचें यंत्र. १०. कायस्थ. ११. मोगल. १२. दक्षिणेंतील लढणारी जमात. १३. रांगडी जात. १४. मामासुद्धां. १६. विश्वासु १७. शत्रु (सं) १८. लुटालूट. लढाईची.

नसुबा केली परंतु फौज थोडी वरचेवर पुण्याहून सरदाराच्या रवानग्या होत होते ते तूर्त राहिली फौजा आणावयास उद्योग करीत होते इतक्यांत पुण्याहून राजश्री आपुजी नाईक व गोपाल गोविंद व परशराम पंत भाऊ व नीलकंठ त्र्यबक व मल (३३) हरराव रास्ते वगैरे लहान थोर सरदारास तीस चाळीस हजार फौजनिसी जोगाई आंबा मुकामी बालेघाटास दाखल जाहाले पहिले सतर हजारात हे मिलोन संवा लाख गाहा जाहाला नंतर कूच करून अमित्रास गाठून तीन महिने परियंत जुज[1] जाहाली परतु अमित्राची दम (३४) सरली नाही जागा आडचणीचा मैदानास काढावे यैसी मसलत करून जुजात[2] धारगावाजवळ या मैदानांत घोड्याच्या तुडवणीस[3] जमीन सररास जाणोन तमाम सरदार यक दिल होऊन जीवाची तमा[4] अगदी न धरीता शत्रु पराजित कराव या (३५) या विषई मोठे शुर अत्योतम उमेदीनें तमाम तोफा व रेखले[5] येकदम सरबती देऊन धुरावर बेजर्ब[6] घोडे चालून मारामारी करू लागली घोड्याची तुटवणी[7] व तोफाची मार व बाण व जेंजाले व रेखले व जंबुरे व फटकड्या[8] वगैरे (३६) ची येक रंजक[9] केली तेव्हा सरबती जाली सरदार लोक मोठी मर्दुमी[10] करून सम रंगणीच्या धुराल्यात सूर्य किर्ण आछादन होऊन आधःकार पडला आपपर दिशेनास जाहाला आशा लढाई करून मोगलास माग सरकविले मरोठ यानी जुजाची सीमा केली अमित्र कचखाउन मोठे घाबर जा (३७) हाल फौजाची मोड जाहली हे वर्तमान आकबर नवाब व सलाबत जेंग याणी यैकोन मराठे मोठे जबरदस्त पराक्रमीस सैफैजंग लढाई करणार जिवाची तमा आगदी नाही सलूख केल्याशिवाय परिणाम लागत नाही अस निश्चय करून अविदानी[11]

---

१. युद्ध. २. युद्धांत. ३. चालण्यास,धावण्यास. ४. क्षिति,मीति (अ) ५. तोफांचा प्रकार, गाडीवर चढवलेल्या तोफा. ६. निःशंकपणें (फा). ७. तीनप्रमाणें. ८. दारूनें भरलेल्या नळ्या असलेले एक शस्त्र. ९. दारू मोळ्यांची गर्दी (फा).१०. मर्दुमी, शौर्य (फा). ११. न (कान) टोचलेले, मुसलमान.

सलाची[1] (३८) पैगम लाविली मातबर सरदार व कारकूनास रवाना केले त्याणी येऊन भाऊसाहेबास भेटून सलूकाच जाबसाल करू लागल ते यैकान भाऊसाहेब याणी अत्यंत संतोष होऊन उतर दिलह जे परांडे प्रांत व दौलताबाद व किले मातबर या खेरीज फौज (३९) ची घासदाणा[2] व काइम[3] खर्च वगैरे सलूक हाणेची भाव असल्यास मखलासी[4] करून घेऊन येणे असे बोलोन याद ठराऊन वस्त्रपात्र देऊन निरोप दिला नंतर त्याणी जाऊन नवाब यास सविस्तर निवेदन करून यादी दिल्या आशेत्क[5] दुर्बलाने जबरदस्तासी वि रोध करून (४०) नये पुढ प्रसंगानसार करावे याच करणेस येईल तूर्त त्याच्या यादीस रूजू घालाव म्हणजे यादीस[6] रूजू घालाव म्हणोन यादीस मखलासी करून परांडे प्रांत व दौलताबाद आदि करून व मातबर किल्यास देखील सोडचिठ्या आपलेकडील वकीलास देऊन घास (४१) दाण्याची अैवजसुधा सोडचिठ्या बरोबर देउन रवाना केल्या पराडे प्रांत व दौलताबा (४२) द व असीरीची किला व नगरच किला व अमदानगरच किला व जेलदुर्ग बरहाणपूरच किला वगैरेच ठाणे घेऊन कमाविसीदारास फौजसुधा ठेऊन बंदोबस्त केला साठी लाखाचे मुलुक घेतले असे अमित्राच भंग करून राज्य काबिज करी करिता चालि (४३) ले त्याची विख्यात लिहून पुरवत नाही श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब याच्या पुंण्यप्रतापास दुसरे जोड नाही जेयप्रद होत चालिला भागानगरकर अमित्र हतवीर्य होऊन आपल्या जाग्यास दाखल जाहाले तदनंतर भाऊसाहेब कूच करून राज्य सर करीत गंगा (४४) तीरास आले उतरेकडून बातमी आणविले की नजीबखा रोहिला व सुजातदौला व आबदाल आली ईरानी याणे राजकारण करून दोनी लाख फौज सुधा आटकावर

१. तहाची. २. घोडेस्वारांच्या पोषणास लादलेला कर, वैरणीचा खर्च, मराठे परक्यांच्या राज्यांतून वसूल करीत, नागपूरकर भोसले हा वसूल करीत, शेकडा वीव टक्के मालगुजारी इतका असे. ३. निश्चित खर्चास. ४. चातुर्याचीत उजोड, सारवा सारव (अ). ४. दुर्बळ.

आला राजश्री दंतोजी सिंदे याणी लढाई भारीच केला परंतु मागील फौज अमित्राची भारी याजमुळे ठरावन (४५) होता कच खाऊन माघारे आला हे वर्तमान भाऊसाहेबानी यैकोन मनसुभा सरदार मंडळीस करून हिदुस्थानाची मोहीम नेमणूक सरदारास समागमे घेऊन कूच करून नर्मदा पार होऊन उजनीवरून मालवे देश सव्ये ठाकून नरवराच घाठ व मालवेच घाट उत (४६) रून [1] नरवरावरून व नरसीस दाखल जाहाले त्या प्रांताच्या कमाविसीदार व जमीदार यास पत्र रवाना केली जे आपल्या फौजानिसी येणे म्हणौन त्याजवरून आज्ञा प्रमाणे आपजी माणकेश्वर व आपाजीपंत व शेमशर बहादर व रंगो रघुनाथ व भगवंत देवजी व विष्णु सदा (४७) सिव व नारोपंत नाना व विठल भगवंत व गंगाधर माहादेव गोविद रंगो वगैरे सरदार फौजसुधा येऊन दाखल जाहले या खेरीज कुंजपूरकर सुरज्यामल्ल जात तीस हजारे फौजेनिसी येऊन भेटला बहुतच मित्रभाव जाहाला रोज[2] बर रोज उमेदवारींत चालिला बेमो (४८) [3] बलग फौज जमा होऊ लागली कलम भारी केली दल आसंख्यात जाहाल च्यार लाख घोड्याची गणती भाले करोले वगैरे बत्तीस आयुधानिसी जाहाली मलहारजी होळकर व जेनकोजी सिंदे व आपाजी माण– केश्वर व खासगत देखील उजनी व नरवर येथील व पडावाचे तोफसुधा लहान थोर येकंदर मिलोन दोन्ही (४९) हजार तोफांची जमयेत आली व रेखलें दींडहजार फटकड्या तीन हजार व जेंजाल सात हजार व बाण दीडलाख व दारुगोल्या बेसुमार व गोलंदाज व जेंजाल बारदार व अरब व सिद्याची कंपूसुद्धा येकरंजकी गोले चालवणार येकलाख जमले भले हिमतींचे जीवाची (५०) तमा[4] नाही स्वामी कार्यावर केवळ आदर असे पराक्रमी युद्ध निरीक्षण केव्हा करू असे अपेक्षित होते यासिवाय स्वार भाले करोले मारक अतिनिपुण परम भयकर शत्रुदल भेदक असे पराक्रमी नामांकित

१. कमी अधिक सारा दिला कीं काय पाहणारा अधिकारी (फा). २. प्रति दिवशीं. ३. अगणित. ४. क्षिति, पर्वा (फा).

कदीम चाकर अनेक वस्त्रभूषण अलं (५१) कार शोभित युद्ध-कांक्षा अभुक्त शारदुल शत्रु सैन्य इभ भक्षण करावयास समर्थ व मलहारजी होळकर व जेनकोजी सिंदे आदिकरून सरदार श्रीमंताच अैश्वर्य धंन्य कार्यसिध्धि करणार अनेक माणिगणख चित भूषण अलकार गज तुरुंग आंगले इत्यादि आत्यो (५२) त्तम आयनारूढ संपूर्ण बल पराक्रम अैश्वर्य विख्यात लोक अतिशयें स्वामी शेवात अचेंचळ भक्तियुक्त अनेक शेत्रुसिरोमणि छेदक यैस दलपतिया-समेत राजश्री भाऊसाहेब विश्वासराव उभयेताच शैर्य वीर्यबल पराक्रमी सैना धर्म परोपकार (५३) लक्ष्मी सानिध्य दिगविजये सौदर्यनिधी या उभयेताच पुण्यप्राताप वैभव लावण्यरूप लिहिता पुरवत नाही असे अपार भार्गवोपम उभयता फौजेच गाहा करून पुढे चाल करून नर्मदा पासून आंतरवेद[1] परयेंत पादशाईच खास गत मुलुक मारून फ (५४) स्त करून सोनपूंर मैदानांत लस्कर उतरल दिवसा दिवस फौज उचंबलित चालली जाट आदिकरून आनकूल होऊन हुजूर दाखल जाहले आणि तिकडील जमीदार लोक आपणाकडील जमी[2] वकीलास पाठऊन भाऊची मर्जी राखविता जाहाला याखेरीज जेय (५५) सिंग याच पुत्र जेयेनगरकर व बुदलखडपूर कर व जेयपूरकर व राजवाडकर व मारवाडकर वगैरे याणी पाठऊन मित्रभाव केले आपले ठिकाणी आसून दारू गोले वगैरे सामान पाठऊ लागले हस्तनापूरकर याणी बद नजरे धरून आबदाल आली व आपण येकत्र (५६) होऊन भाऊसाहेब याच उपमर्द न करावयाचे विचारास सलाबतखा व सुज्यात दौला लखनौसुभा व नजीबखा रोहिला आयुध्याच सुभा इतक्यास सामील करून घेतले जाठानी मित्रभाव भाऊसाहेबास दाखविला परंतु आबदाल आली इरानी यास अटकेपैलीकडून जाठानी आणविला हे वर्तमान (५७) भाऊसाहेब यास कळोन होलकर वगैरे मातबर सरदार मंडलीसी खलबत करून सुज्यात

१. गंगा व यमुना यांच्या मधील प्रांत. २. खोडलेला शब्द.

दौलला याजकडून वर्तमान आणावे यास आणि ईरानीची मसलत मोड कराव अशाकरिता मातबर वकील पाठविले जे आबदालआली बेइमान आहे पेशजी येऊन पादशाई शासन केवळ अनुमात्र बा (५८) की राहू दिली नाही असे असता तुमही व नजीबखा रोहिला मिलोन हे कर्म करणेस प्रारंभ केला ही गोष्ट अनुचित उत्तम दिसत नाही तुमही व आमही येकत्र होऊन पेशजीच उसणे फोडाव त्यास आबदालआलीस आगदी बुडऊन फस्त नाबूद करावे अटक (५९) पासून अैलीकडील मुलुक त्याणी आगदी घेतल लाहूर आदिकरून पादशाई ठाणी होती ती उठऊन आपली ठाणी बसविली पुढ याचप्रमाणे पादशाई शासन मोडीत आहे भरवसा त्याची मानून हा मनसुबा समजून दिलहा आहा: परंतु कामाच नव्हे म्हणोन अनके रीती (६०) ने सांगोन पाहिले परंतु येंकता वकीलाबरोबर उतर सांगोन पाठविले जे पादशईत काही बाकी राहिली नाही जाट वगैरे जमीदार बदमस्त होऊन पादशाई मुलुक मारू लागले त्यास नतीजा देऊन गर्दीस मिळवावे बदोबस्त कराव याआर्थी आबदालआलीकडून करावे यास आम्ही फौजसुधा आणिले आहे (६१) यैसे वकील येऊन विनंती करवता जाहाला भाऊसाहेब क्रोधायमान होऊन आबदाल आली व नजीबखां रोहिला व सुज्यात दौलास सुधा मारून गर्दीस मिलवावा असे बोलोन जाट यास मसलत करावयास आणोन मलहारजी होळकर जेनकोजी सिंदे वगैरे मातबर सरदार व समोदिक मुछदी व येकाडे मा (६२) नकरी सहित दरबारी जाटाकडे पाहून बोलील कीं सुजात दौला कडील आम्ही मनसुभा करून पाहिलिया आगदी विरोध भाव धरून आबदाल आलीस मिलोन तुमहा लोकास पारपत्य करावयाची मसलत भारी परंतु दुसरे नाही ये विषई तु (६३) मची मतलब कसी आहे म्हणताच शिष्कोपचाराच्या गोष्टी जाट बोलिला त्यास उत्तर भाऊसाहेबानी दिल्ह की व्यर्थ उपच्याराच्या बोलण्यावरून उपयोगी दिसत नाही मनसुबाच सिध्धांत आम्ही विच्यार करीत असता जाट

आपल्या अंतरंगी (६४) योचिना करून बोलू लागला की आपणास मिलोन पादशाईवर व ईरानीवर आम्ही कमरबंदी केलियावर आदावती करतील आपण फौजसुद्धा आपल्या देशास जाणार आम्ही येथ नेहमी राहणार तेव्हा आपली कुमक आम्हास होऊन जगत नाही स्थानभ्रष्टत्व प्राप्त होईल याज करिता (६५) आपणास मिलावयास आमच भरवसा धरून नये असा विचार समजोन भाऊसाहेब तप्त होऊन पादशाई तख्त रत्नखचित सुवर्णाच सिंव्हासन फोडुन व खजीना फोडून फौजेस तलब[1] देऊन मजबुदीने सारे फौजनिसी दिल्लीच्या बंदोबस्तीस नारोशंकर यास बाहादर किताब देऊन (६६) वजींराच्या कामावर ठेऊन आपण कूच करून च्यार पाच मजल–चालोन येमुनातीरास मुकाम केले जाठाने तख्ते फस्त केला म्हणोन मनांत विकल्प आणोन यास उचित नव्हे असे ध्यानांत आणिला परंतु मुलाहिजामुळे बहिरंगी विरुध्ध दिसू न (६७) देता सलूखेने निरोप घेतला भाऊसाहेब याणी त्याचे इंगीत समजोन बहुमानानी वस्त्र व भूषण देऊन निरोप दिलहला जाट दोहोकडील सधान राखून मित्र भावेकडून आपले ठिकाणी फौजसुधा मजबूतीने राहिला नंतर निवडक राहिली फौज थोडीच व मल्हारजी होळकर व ज (६८) नकोजी सिंदे वगैर सरदारचे फौज दक्षण प्रांती दोनी लाख व उतरेकडे रजपूत व बुंदेल व मारवाडी वगेरे दीड लाख येकून साडेतीन लाख स्वार याखेरीज कंपुसुधा लाख पायदल पुढ चौतर्फा तोफा पसरविल्या अगदी तोफाच किलाच जाहला आशा (६९) बेताने ठेऊन यमनासंनिध मुकाम केला आबदाल आली येमना पैलीकडे घाट धरून तोफखाना पसरवून चौफेर फौज ठेऊन मुकाम केला त्याच विस्तार खुद आबदालअली इरानी व नजीबखा रोहिला व सुजातदौला तीघाच मिलोन तीन लाख स्वार का (७०) चेन मयमणी भूषित बतीस आयुध धारक विरोधी वीर उदंड विक्रम निष्करूण आनिवार आयुध मद्यमांस

१. मागणी, पगार (फा).

शेवानिरत देवब्राह्मण पीडक अति दुर्मार्ग अमित्र येक जात सिलेदार युध्धकांक्षा करणार महमद हुसेन व शमशरजेंग व जिरायतखान अरब (७१) व आदुखा रोहिला व साबूतखा व रूस्तुमखा जगदेव इसमाईलखा व ग्गाजीखा गोरी व मिर्जा हुशेन व आलम शाहा व मानशाहा वगैरे मातबर सरदार अनेक वस्तूच ठाई सुर्वर्ण व नवरत्नेजडित भूषण सकल अैश्वर्य (७२) संपन्न समरंगण कर्मास मोठे शुर पराक्रमी कुशल हटखोर कुलीन असे सरदार रणोन्मुखी अति दारुण युधाचे उमेदीने होते पायदल लाखो जमीयत व तोफखाना लंब[१]छेडी हजार व रेखले[२] वगरनाल[३] व जबुरें[४] व जेंजाल[५] व मकरबीबी[६] व बाण व दारूगोले यास संख्या नाही (७३) यैस अपार सरजामसहीत आबदाल आली व त्याचा पुत्र तैमूरशा उभयताच बल पराक्रम धैर्यरूप लावण्य औदार्य बलवंत लिहिता पुरवेना अैसा आबदाल आली युधाच्या ठाई आत्यंत उल्हासाने येमुना उतर तटाकी घाटावर मुकाम केला त्या लस्करास वै (७४) रण दाणा करिता पादशई खालसात मुलुक दोहीकडील फौजाच्या तुडवणीखाली वीसपर्यंत उभय तीरी अगदी बेचिराख जाहाला रसदबंद जहाला अमित्रानी आपल्या फौजास रसद तिकडून आणविली त्याप्रमाणे भाऊसाहेब याणी चाळीस पंनास हजार फौज माघारे आठच्यार मजल पाठ (७५) ऊन भरवस्ती मुलुक मारून फस्त लुटोन काढला आणविताच वेळ इतक्यांत पुण्याहून जासूद आले श्रीमंत नानासाहेब याणी आगोधर च्यार क्रोड रुपय रवाना केले होते मलहारजी होलकर याजकडील तीन क्रोड रुपय आले होते व जेनकोजी सिंदे याजकडील येक क्रोड येकूण आठ क्रोड लस्करास दाखल (७६) जाहाल उपरातिक पुण्याहून खजीना रवाना जाहाला तो लस्करास पोहचले नाही तीस हजार फौज बरोबर यैवज यावयास वाठ पुठेना रवानगीचा खजीना ती सुरजेत

१. लांब पल्ल्याची तोफ. २. एक प्रकारची तोफ, छकड्यावर बसविलेली तोफ. ३. उंटावरील तोफ. ४. फिरवतां येण्यासारखी लांब नळीची तोफ.

व उजनींत व नरवरात येथ जागी जागीं आटकोन राहिला डाक बंद जाहाला कागदपत्र येऊन पोह्चेना खर्चाची आडचणी पडली त्यास कुं (७७) जारीकर व जाट सुरजमल्ल व उदेकोटकर व बुंदेलकर वगैरे जमीदार घरोबा राखून दाहा क्रोढ रुपय गुप्तरुपे पोह्चविले तैसेच बुदेलखंड व गुजराथ व खानदेश येथील यैवज भारी आला या खरीज सवाई जयसिंग व चितोडकर राणे याणी गुप्त रुपे खजीना पाठविला माघाईमुळे दाणा ल(७८)स्करात आगदी मिळेना येक रुपयेस येक शेर दाणा जाहाला सभोवता चौह्कड वाट धरून अमित्राच दुरवोढ पडला कुंजंपूर भरवस्ती शाहार होता फौज पाठउन लुटून आणिले तेथ मातबर आमीर उमराव व मानकरी साहुकार त्या शारात होते ठाण्यांत सरकारच खजीना होता तो शाहारां(७९)तील बदोबस्त सापडला साहुकार क्रोडादिपती होते पादशाई खजीना लुटून फस्त करून आणिले बेंविस क्रोड रुपय व जडजवाहीर व सोने रुपे व हिरे कंकर वगैरे भाऊसाहेबच्या जमदारखान्यास दाखल जाहाले दाणा बेमोबलग मिलत चालिला रुपयेस तीन शेर प्रमाणे गला (८०) मिळू लागला वरचवर लस्कराच उठवणी करून दिलीच मुलुक नामांकित शाहारा मारून नाबूद[1] करून काफला[2] आणविले राजश्रीं नारो शंकर राजे बाहादर वजीर याणी अनेक द्रव्ये रवाना केले ते पोह्चल लस्करात कोणत्याविसी तोटा नाही परम उलहास धैर्य (८१) भुजे पराक्रम भाऊसाहेब व विश्वासराव यास जाहाला मुलुक पादशाईच भाऊसाहेबानी लुटून फस्त केलेले वर्तमान अमित्रास कललेवरून आबदालअलीकडील सुजातदौला व नजीबखा रोहिला परम क्रोधायमान होऊन तप्त जाहाले प्रति(८२)ज्ञा केले जे मराटे यास नतीजा पोह्चविलेपर्यंत पागोटा बाधणार नाही म्हणोन पागोटी टेऊन रुमाल बांधिले आनेक भोगाधिक त्येजून इतर जेनाकडे आवलोकन करावे याचे विसरेल

---

१. नष्ट (फा) २. प्रवाशांचा तांडा

शेत्रूच पारपत्य करावे हाच निछयें करून निजध्यास लाऊन घेऊन आपले समा(८३)नस्कंद मातबर सरदार यास मिळून घेऊन आबदाल आलीकडे उभयेता येऊन मराटे याणी पादशाई राज्य बेचिराख करून बेमोबलग मालमता लुटून नेले महणौन तपशीलवार वर्तमान ईरानीयास सांगितले ते अैकून आबदालआली इरानी परमरोषायमान तप्त (८४) होऊन येकायेकी तेक्षणी फौजेस कल वाहून सकल सैन्यासहित दरमजल येमुना तठाकास येऊन दोन तीनशेहे नावाच पुल बाधोन नदीपार होऊन लागले ती बातमी भाऊसाहेब यासी कलोन शेत्रूची फौज येमुनापार होऊ द्या (८५) व तांडावर मारून गर्दीस मिलवावे अैस आज्ञा करून दमाजी गाइकवाड व शेमशेर बाहादर विटल सिवदेव व आपाजी माणकेश्वर व येशवंतराव पोवार व जेनकोजी सिंदे व इभरामखा गारदी वगैरे सरदार दोन लाख फौजनिसी व तोफा खा(८६)ना लंबाछेडी दीड हजार व जंबुरे व रेखले व जेजाला व गरनाला व फटकडद्या व दारुगोले अगणित देऊन रवानगी केली येमना तठाक धरून तमाम सरदार गाहा करून तोफा पसरून अमित्राच्या सेनावर येकदा सरबती केली किंचित अवकाश (८७) पडली नाही यकदम तोफा झडू लागल्या सारे तोफाच लागू शेत्रूच्या सैन्यावर जाहाला सडी फौज अंविदाची येमुना तटी पैलीकडील तीरी राहिली होती आगदी तोफाचे माराखाली झरझरीत जाह्ली बाकी किमंपि आवसान राहिला नाही जखमी आपरं (८८) पर जाहाले काणाच पाय काणाच हात कोणाची डोई जाऊन धड राहील या प्रमाणें छिन्नभिन्न जाहाले घोडे दलाची अैसी आवस्था जाहाली कोणी घोडे ठाकून पळोन गेले कोणी गोट सोडून गेले हती व उट व तोफखाना सरंजामसुधा व खजीना ठाकून धासत खाऊन आबदाल (८९) आलीं दणारे होऊन हतवीर्य होऊन बाकी राहिलेली फौजसुधा माघारे जाऊन लागू चुकवून मुक्काम केला आविंदाची फौज कच खाऊन माड जाहाली म्हणौन हे वर्तमान

भाऊसाहेब याणीं येकोन सतुष्टचित होऊन आबदालआलीकडे वकील याजबरोबर (९०) पत्र देऊन रवानगी केली जे तुमहास नजीबखा रोहिला व सुजात दौला उभयता कुमक होऊन लढाईस येमुना तठाक पर्यंत फौज सुधा येऊन माघारे परतला हे तुह्मास योग्य नव्हे तुमच येणें जलदीने होहील आथवा आम्हीच यावे कूच करून (९१) यावयास आम्ही सिध्ध आहो तुमची व आमची लढाईस फौज गाहा व्हावे यास तफावत नाही हाच करार फत्ते होईल न होईल हा आदेशा दालीबंदाच नव्हे आपला मनसुभा कची आहे ह्मणोन वकीलाने सांगताच आबदाल आली व सुजात दौला व नजीब (९२) खा राहिला आणि मातबर सरदार व मानकरी व समोदीकवाले साहेब लोक व मीरअमीर व दिवाण वगैरे मडलीसहित दरबार करून मनसुबा करू लागलें जे माराठे याणी शर्त केली जबरदस्त मोटें हटीखोर लढाईत बहुत चेतुर आमची फौज त (९३) माम त्याची खातरेत नाही वर चडून आले पुढे लढाईच दंम भारी दिसतो जात जमते फौजेंचे अजमास कलत नाही वकीलाच बोलण्यावरून लढाईस पुढे कंमी दिसत नाही खुदायतालान करील ते होईल तख्त यम ताबूदत[१] दोहीत काय (९४) ते येक होईल मो हरम करावयाच अगोधर पैसत्याच होऊ देऊ नये प्रथम या मसलतीस येऊ नये अत्ता जीवाची तमा देऊन माघेपुढे तजवीज करून उपयोगी दिसत नाही या प्रमाणे लढाईची मनसुबा मोकरार करून पत्र लिहून आम्हीच नदीपार होऊ (९५) न येते खामखा लढाई तुमची आमची तिकडे होहील तुमही इकड येऊ नये म्हणोन वकीलास सागोन आपल्या वकीलासमागमे वस्त्रभूषण घोडा व तरकस कमान देऊन पाठविले ते येऊन वर्तमान विनंति केली आविदाच वकील सामान प्रविष्ट करून विरोप घेतला (९६) नतर आबदालआली व सुजात-दौला व नजीबखा रोहिला व मनसूरआली व सरदार मिळोन तोफखाना माघारे ठाकून भारी हिमत धरून दोनी लाख सडे

१. नष्ट (फा).

फौजेनिसी येमुना तीरास आले आणि पाचसेहे नावच पूल बाधोन तमाम लस्कर उतरू लागले हे वर्तमान (९७) भाऊसाहेब यास कलोन तमाम तोफमारे करून सरबत्या येकदम केली तोफा झडू लागल्या बाण सोडू लागल व फटकडचा ठाकू लागल्या व गर्नाल सोडू लागले येणेप्रमाणे मारामारो व हिरर्षहिरी सीमाच जाहाली माराखाली आविंदाकडील लोक ठार व जखमी बेमोब (९८) लग जाहाले ते विचित्र लिहिता पुरवेना बहुत हलाखी जाहाली तरी दंम भारी धरून जीवाची तमा सोडून येमुनापार होऊन आबदाल आली फौजसुधा आगदी याच्या तोडावर येऊन मुकाम केला दोहीकडील सैन्याच मुकाम पाणपंत व सोनपंत येथे जाहाला द्वापारांत (९९) कौरव व पांडव याणि युध्ध केलेले स्थली कुरूक्षेत्री पुण्यभूमी श्री भगवान कृष्णमूर्ती भूभार हरण करून आटरा क्षोणी सव्हारक त्या स्थळात कौरवाच्या प्रदेशात आती विशाळ केला स्वर्गतुल्य आनेक मर्णीभूषण निबंडी[1] करित यैस सैन्यसहित सा (१००) गरोपम मुकाम केला होता त्याच पश्चमभागी पांडव राहिलेले भूमींत आबदाल आली फौजसहीत मुक्काम केला दोही फौजसहितच गोठास गोट भिडले आगदीं दाटीने उतरले आगाडी पिछाडी बारा कोस जमींन भरली लष्कर आनिवार पाहोन खेचरी यास आद्भुत (१०१) वाटले आनेक लक्ष पाहून गोटीची जागा कायम करून निशाण नाना प्रकारच्या रंगाच्या त्यात्या जाग्याच्या गोठासमीप फरफरू लागले घोडा येकयक फाऱ्यास दोनी हजारप्रमाणे बेमोबलग फरे लाविले हती व उट व साड आगणित याच फरे[2] शेभू लागले व (१०२) तोफाखाना भाऊसाहेबाच्या फौजात बहुत आमोल्य रोप्यप्रमाणे करंदानी चमकु लागले बाजारी नवधांन्ये आनेक रसद्रव्ये व पीताबराची रासींन नानाप्रकारच्या आमोलिक वस्त्र व नवरत्न व सोनेरूपे व जडजवाहिर व तांबे पितळे लोह आदिकरून आनेक प्रकारचे जिनस आ(१०३) त्योतम नि बाहु कृत प्रकासित असे उभये

---

१. सजविले असतांना ? २. फरारे, पताका.

शैनांत शाजारो[1] व शाजाने झणाणु लागले भेरी[2] दुंदुभी डंका काळी ताशे मर्फे वगैरे वाद्याविशेष गणतीस लागले या प्रकारे आति उल्हासे कडून दोही फौजाचे मुकाम जाहाला आप आपले फौजात बंदोबस्तीने रात्री दिवस (१०४) छेबीना[3] राखत होते इरानी मोट दगेखोर सामदान दंड भेद चेतुरोपाय आणि फंदफितूर करून छपा पडून घात करतील म्हणोन भाऊसाहेब कामाट्या व बेलदारास आज्ञा केली लस्कर सभोवती पंचेवीस गज रुंदी व चाळीस गज खोल अैस खंदक खाणौन तयार करणेविसी (१०५) त्या प्रमाणे खंदक सिध्ध जाहाला आट दरवाजे खंदकास करून साऱ्या तोफा पसरऊन सावधगिरीन होते उभये सैन्याकडूनही युध्ध प्राराभ न होता दोनी महिने मुकाम पडला लस्कर कूच करून तफावतीने मुक्काम करावे आगदी कसाक परंतु येकाच दहशात येकास गनीम जोरावर हाव भरऊन पि(१०६)छा पुरविले वाताहत होहींल येस मनसुबा करून परस्परे जातीने हठाने राहिले उभये शैन्याची तुटवणीखाली आसपास सवाशेह कोस मुलुक आगदी बेचिराख जाहला वैरण दाणा मिळेना रुपयस शेर ध्यान अैसी मागाई वैरण ही तसीच त्याप्रकारे उभय फौजात हाहाकार जाहाला परंतु पेश(१०७)वाई फौजेत तुठाग्र भारी पडली तंगच्याई मोटीच प्राप्त जाहाली दंम धरून मुकाम केले गोरगरीब फौजेत कसे टिकतील आम्हीचे लढाई सुरू करावे असे भाऊसाहेब व विश्वासराव याणी ठराऊन तमाम सरदारास आणऊन आज्ञा केली की प्रातःकाळी लढाई (१०८) स निघावे असे निरोपोन दरब्रार बरखास्त केले सरदार मंडळी आनंदभरित होऊन आपआपले गोठास गेले रात्रक्रमण करिते जाहाले आपरात्रीसे रणभेरीस हुकूम करून सरदाराच्या गोठास भालेदारास रवाना करून तयारीच ताकीद करविलें आपण उभयेता इष्ट मंड(१०९)लीसहित स्नानसंध्या

१. मंगल वाद्यें, सनई, बाजंत्री. २. नगारा, कर्णा, नौबत. ३. रात पहारा, रातमिरवणूक (फा)

जेपतेप औपासनादि नित्यकर्म सारून गृहदान आदि करून ब्राह्मणास संतोषवाऊन मौनमंत्र कुलदेवता स्मरण करून बाहिर सभेची चांदणीस येते जाहाले सूर्य उदयाद्रीरूड जाहाला मल्हारजी होळकर व जेनकोजी सिंदे व शेमशेर बा(११०)हादर प्रभर्ती सरदार आदि करून आपआपले फौजनिसी आनेक भूषण आलकृत युक्त होऊन मिसलावर बतीस आयुधसहित पटे धरून उभे राहाते जाहाला खासा पागावर मिसळावर आली मातंगद्वये आनेक मणीगण जडजवाहिर भूषणालंकृत आबारीसहित पर्वतोस (१११) मान समोरे सिध्ध करिते जाहाले भालेदार काल निवेदन सुचवित जाहाला शाहाजयाने व रणभेरी झडू लागले वीर आर्भाट व वाद्या जयंकार आष्टदिशा भरून कांदले[१] भाऊसाहेब विश्वासराव उभयता गज्यारूड जाहाले इभराहीमखा गारदी याणे तोफ (११२) खाना सुधा जिलेबेत चालविता जाहाला लाख फौज कितेक तोफा व कितेक सरदारास टिकाणीसी संरक्षणार्थ टेऊन बदोबस्त करून निघोन खंदकाबाहिर युध्ध भूमीस जाऊन च्यार टोळचा फौजाच्या केल्या दर ठोळचास पनास हजार फौजेची नेमणूक केली पुर्वेकडे मलहारजी होळकर पनास हजा(११३)र फौजनिसी उभा राहिला पुढ तोफखाना पसरविला उतरेकडे विश्वासरावसाहेब व शेमशर बहादुर व जेनकाजी सिंदे वगैरे सरदार पंनास हजार फौज ची निसी सडेनिसी उभा राहिले मोहरे कंपू व बाणदारास उभे केले तोफाच गाहा करविले दक्षणकडे खुद राजश्री भाऊसाहेब व येशवतराव पोवार व आपाजी (११४) जाधव वगैरे सरदार पाउणा लाख पायदल फौजनिसी तयार राहिल व इभराहिमखा तोफखानावर लाख पायदलानिसी मजबूदीने राहिला अशा फोजाच्या गाहामध्ये कृतांत कालोपम सकल वाद्ययुक्त सदाशिव पंत भाऊसाहेब शोभू लागले हे पाहून इरानीस बातमी कलोन महराटे लढाईस तयार होऊन उभे रा(११५)हिले आहेत म्हणोन

---

१. कोंदलें, व्यापले.

कलताक्षणी आबादाल आली आपल्या फोजेस तयार होऊन येणेस खबर जाहीर करविले आपण खैरात वगैरे करून भोजन उरकोन वस्त्र भूषण अलंकार कृतयुक्त होऊन बाहीर दरबार डेरेस दाखल जाहाले दिवस दोनी तास चडला होता सुजात-दौला व नजीबखा रोहिला व मनसूरआली व हस्तनापूरकर वगै (११६) रे सरदार आमीर उमराव वगैरे आपआपले फौजनिसी तयार होऊन मिसलावर हाजर जाहाले खुद आबदालआलीच हत्ती आबारीसहित हाजर जाहाला शहाज्याने बेमोबलग झडली आनेक वाद्य होऊ लागले निशाणाच फरारे[1] मोकळ सोडिल अबदाल आली हतीवर आंबारींत स्वार जाहाला फौज चालू लागले रण-भूमीस येऊन फौज सुधा चालोन (११७) च्या दोन्ही ठोल्या केल्या दर ठोलीस लाख फौज नेंमून उभा राहिला हे पाहून मराठे याणी निशाणांचे फरारे मोकळे सोडून हती समोरे चालविले प्रा:त-काली पाचवे तासी लढाई प्रारंभ जाहाला भाऊसाहेबाकडील तोफाची सरबती जाहाली अग्नीच मारा अतिशय जाहाला परंतु ईरानी यास जीवाची तमा ठाकून बेंजरब फौ (११८) जसुधा चालोन आले भाऊसाहेबाकडील फौज्याच्या च्यार ठोळ्या अमित्राच्या फौजेवर बेजर्ब चाल घेतली हातघाईची जुज जाहाली नामे नामे सरदार चयार पाच शेहे यासिवाय धारकरी हजार बाराशेहे घोडे दोनी हजार इतके ठार जाहाले व जखमी हजार बारासेहे येणे प्रमाणे भाऊसाहेबाकडील अमित्रानी नाशे केला अबदाल (११९) आली इरानी याजकडील पंचेवीस आबारीतील सरदार ठार जाहाले पठाण वा रोहिले नामांकित च्यार पाच हजार ठार जाहाले व घोडे आठ दहा हजार व पायेदल बारा हजार ठार जाहोले सुजात दौला व मनसूरआली व नजीबखा रोहिला याच्या फौजात बहूतच नाशे जाहाला हातघाईमुळे राहिले व रजपूत व रांगडे व पठाण लोक व (१२०) काईत[2] बहुत ठार जाहाले जखमी अनिवार जाले

---

१. पताका, निशाणें. २. कायत, घुमश्चक्रींत.

भाऊसाहेब लढाईची शर्त मर्दूमी केली इरानी याणी मार खाऊन माघारे सरलें आबदाल आलीची खुद आबारी सभौते महराटे गाटले हस्तगत होया जोग जाहाला ही अवस्था यैकून सुजात दौला व नजीबखा रोहिला व सरदार सुधा यकदंम उठावणी करून बेजर्ब महराठे यास मारून आ (१२१) बदाल आलीची आंबारी फिरऊन घेऊन माघारे आपल्या गोठास जाऊ लागले भाऊसाहेबाला फौज पाटलाग करून अमित्राच्या फौजेस गोठापर्यंत मारीत गेले आबदाल-आली गोठास दाखल जाहाला भाऊसाहेब जेयभेरी व चैाघड्या वगैरे आनेक वाद्ये वीर आभार्ट[1] समवेत आत्यंत हर्षायमान होऊन सैन्य सरदार सुधा गोठास दा (१२२) खल जाहाले सरदार मडली निरोप घेऊन आपआपल्या टिकाणास गेले भाऊसाहेब व विश्वासराव इष्टमडलीसहित भोजन उरकोन बहु सतोषाने रात्रीक्रमण करिते जाहाले तिकडे आबदालआली व सुजात दोला व नजीबखा रोहिला व मनसूरआली वगैरे मातबर सरदार व आमीर उमराव वगैरेस आणऊन दरबार करून मनसु (१२३) बा करू लागले की महाराटे बहुत शर्त मर्दी करून लढाई केली मोटे जबरदस्त या पुरवी आम्हास याप्रमाणे कोणी जुजले[2] नाही जोरावरीने हिया धरून आम्हास काही हटत नाही याच प्रकारे लढाई करून दग्याने आम्हास बुडवतील याजकरिता रात्र दिवस सावधपण राहावे हरोलीच ठोलीस दस्तास दस्त छेबीना[3] राखून गोठातून (१२४) न पुटता आवकाश न घेता छेबीना करून लागले या उपरी पाउणा महिन्या-नंतर राजेश्री भाऊसाहेब याणी दंम खाऊन आपले गोठाच्या चवक्या काईम राखून फौजा रवाना करून इरानीच्या मुलकावर स्वाऱ्या करून लुटून आणाव हा मनसुबा करीत असतात इतक्यात इरानीस संधान नास वकील पाट (१२५) वितात हि बातमी कलोन स्वस्थ राहिले इरानी याणी आपले तर्फेन हेजिबीस[4] वकील पाट-

१. उत्तेजक पोवाडे म्हणणारे. २. लढले. ३. रातपहारा, रातमिरवणुक. ४. वकील, परराष्ट्रराजकारण लढवणारा (फा)

वावे अैसा निछये करून सुज्यात दौला व मनसूरआली याचे विचारून वकील रहिमत रसूल पठाण व मणीराम रजपूत याजबरोबर सागून पाटविले जे तुम्ही जोरावरीने आटकच सरहद व मारवाडा व लाहूर व बंगाल व आंतरवेद[1] व गया प्रयाग व कास्मीर पावेतो मुलुक काबीज करून ठाणी घातली त्यामुळे पादशाई खजीना आगदी बंद जाहला आटके पैलीकडे जप्त्या बसवीत चालिला आणि चितोड व भेदावर व द्वारका व गुजराथ देखील खालसात केला आगराची खडणी घेतली या खेरीज दिली म्हणजे पा (१२७) दशाई तख्तेची जागा तेथ आपली फौज टेऊन जोरावरीने कैद बसविली याच प्रकारे काशी पैलीकडे तीनशेहे कासावरी कुमारी पाहाडापर्यंत आमल सुरळीत करून पुढ वदरिकाश्रमापर्यंत नजर धरीता रूमशाम आदिकरून पादाक्रांत करून घेऊन हेमाद्रिपावेतो पोहचोजे यकछेत्री राज्य करावा अैसी उमे (१२८) द तुमची याजकरीता आलंपनाहा रूमशम[2] याच बडे पीर पैगंबर सुलतान महमदशा पादशहा याणी आम्हास हुकूम फरमाविले जे दिलीपती पादशहा याणी बोलाविले आहे त्याजकडे तुमही जाणे म्हणोन याजकरिता आटक पार होऊन आलो काये निमित्ये म्हणाल तरी दिलीश्वारा जेगदेश्वर्य व या प्रका (१२९) रे सर्वास वरिष्ट असता पादशाई फितूर तुमही करून रजपूत रागडे ब बडे संवस्थानिक यास कैदेत आणोन जिगाजिग केला चितोडकर राणे व संग्रामसिंग व देपूरकर व आजमेरकर व सवाई जयसिंग या सिवाय बेवीस उमराव येणेप्रमाणे पादशाहा याच्या जाहागोर त्या त्या आगदी तुमही बंद केला पादशाई शा (१३०) सन बळजोरीन मोडली यास्तव तुम्हास नस्तनाबूद करावे तुमची पिछा पुरवेवे दक्षणप्रांती चयार पादशाई निजामशाई व कुतुबशाई व इदलशाई विज्यापूरकर देखील पादशाई याची तख्ते घेतली तैसच बेदर व दौलताबाद

---

१. गंगायमुना यांच्यांतील भूमि. २.

सारिखा जागा घेऊन सारे दक्षणातील किले घेऊन आहुंदनरवर तहद (१३१) उजनीपासून कर्नाटकपर्यंत मुलुक सर केला पादशाई मुलुक सारा काबीज करून हेदराबादेस मोर्चे लाविले मुतलग फतेजेंग बहादर सिंदे सीक याचे मोबतीने असता नवाब यास दिवसा दिवस खाली आणीत चालिला बरहाणपूर व आवरंगाबाद येथे पैट केला मुर्तुजाबाद व सावनूर व बंकापूर व बेलगावही स्थळ जोरावरीने घेतली कर्नाटक प्रांती (१३२) सिरे बालापूर आरकाट होसकाट तमाम पालेगार मातबर संवस्थानिक राजे विदनूर व सौदे हरपनहली व बिळगी सिदापुरती तिचेनापैली श्रीरंगपटण व आनेगुंदेकर नरपती तहद रामेश्वरपर्यंत राज्यास सर करणार चहू फेरा पादशाई सुभेंत शासन बसविली मछलीबदर व कोकण तमाम काबिज केले गोमंतकास धाशतला[१] (१३३) विली तेही सरकणार व काहली बंदर व सुरत व खंबायत तसेच गडकोट किलेची जागा वगैरे पादशाई राज्य व इग्रेज व फिरंगी व अरब याजपासून बेजर्ब खंडण्या घेतल्या ठाई ठाई राज्ये जप्त करून ठेविला समुद्रातील जेलदुर्ग महाकुबल जागें येकापि परीस येक आगले वगैरे हुकुमी घेतले तुमही तो बावन (१३४) पादशाईचे राज्ये सर केला त्यापैकी बाकी राहिले राज्य सर करणार ही उमेद तुमची पेशवाईच्या पादशाई केली असे म्हणविता हे बेकैदी[२] काही जसी तसी नव्हे हे नशा[३] हकतात तुमहास व आमहास देणेवाला मुबारकी देणार ज्यादा आहे भारेच आमर्यादा केली यात कोणती खुबी व की पाहता राहिली आहे माघे जो पा(१३५)दशाई मुलुक काबिज केला आहा तो दक्षण साडेसाहा सुभे देखोल सोडून देणे नरमदेपासून मुलुकात तसदी द्यावेयास गर्ज नाही तुम्हास पादशहानी सरदेशमुखी दिलही आहे ते घेऊन जाजती उपद्रवन करणे या विरहित तुमच्या फौजेस घासदाणा[४]बदल दरसालीना येक क्रोड रुपयप्रमाणे करू(१३६)

१. दहशत. २. उच्छृंखल. ३. गुंगी, धुंदी, मस्ती. ४. सैन्यास लागणाऱ्या वैरण वगैरे पदार्थांसाठीं लावलेला कर. नागपूरकर भोसले वसूल करीत.

न देवितो करारप्रमाणे पादशाई सनदा घेऊन नौकरी करीत जावे हा करार तुमहास मान्ये असलियास सलूक संपादिला जाहले ही गोष्ट खातरेस न येईल तरी लढाई करणे आपण पशे[1] खांतरजमा करून घेऊन निश्चयता प्रमाणे व वार्तानें पादशाई खिदमतेस येक सानी राहून सरफराजी[2] करून घेणे जिद वाढविलीया (१३७) कार्यास येणार नाही यांत तुमही माकुल[3] दरोबस्त असता हाव भारोन दिली इलाखीची जागा पादशाई तख्तेची स्थान व तुमही महराटे याणी पैसे[4] करून पादशाई आपल्य हुकमतीन तख्तारूड करून बेत्रीस उमराव पादशाई पीढजादे नाव पी नावचे कदीम यास दौलतखेरीज होऊन फिरत (१३९) आहेत दिलीची पादशाई थोर थोर काही सामान्ये नव्हे त्या पादशाईस भेतर[5] केले नाही पादशाईस तुमही म्हराटे बेइमानी करून नामे लोक सरदार आमिरूल उमराव आसतनखान दिवाण व जुलफरखान नवाब व नासरजेंग बाहदर व रहिमतखा व फतेजंग बहादर व मनसूरखा पठाण खाने खाने इभराहीमख हत्फह (१३९) जारी कमर्दीआली हुकूमतपनाहा खानदौरा व हुशेनखा भाडभुजे व रुस्तुमखा व फतेखान गोरी व हसनतखान गौरी व दललेखा रणमस्तखा व शास्तीखान व शमसरखा व कलीजखन मुतलब वकील तैसेचे भवानसिंग व जेयसिंग व संग्रामसिंग यैस थर थोरे संस्थानिक याची नस्तनाबूद केली तसा काही हा मजकूर नव्हे यैवढा (१४०) पादशाई आहे म्हणोन वकील याणी तपसिलवार रजेश्री भाऊसाहेब यासी जाहीर केला इरानीची हुकूमप्रमाणे त्याजकडील वकिलानी विनंती केली ती भाऊसाहेबानी श्रवण करून मातबर सरदार मलहारजी होलकर सहित निश्चय करून इरानी याज कडील वकीलास प्रत्योत्तर सागितले जे हिंदु पादशाई (१४१) याच बंदोबस्त जे करणे तो आम्ही कराव तुमही पर पादशाईच असता आपला सरहद टाकून

---

१. पश्चात्ताप (फा). २. अनुग्रह, कृपा. ३. जाणता, बलवान, समर्थ (अ) ७. विस्तार. ८. सुस्थित.

सुजातदौला याच्या विच्यार हाव[१] भरोन आला माघे टेऊन पादशाई बुडविली मीराबीबी[२] बेगम याची ममता टेऊन सारा दगा आरंभिला हेही गोष्ट इनशाकी[३] नव्हे माघे आला ते समई आम्ही असतो तर पादशाई चलबिचल (१४२) होऊन पाहातो की काये तुमही नेमणूक करून देणार कोण आमच्या चितास येईल त्या सारख करू हिमाचलपर्यत मुलुक काबिज करावे हा हिया तेथ इरान तुरान याच पदार्थ तो काये तुमही आल्या मार्गाने आटकपार होऊन भाईचारा[४] राखून जावे ज्याणी तुम्हास फिसात[५] सांगोन सामिल करून घेऊन आले आहेत त्यांत कोणती खुबी राहिली आहे आज तुम्हा (१४३) स दबून राहो हू की काये आम्ही सर्व गोष्टीने सामाने पुरे[६] आहो हिंदु पादशाईची मातबर व वजीर सर्व राज्यभार आम्हावर आहे तीन च्यार लक्ष फौजेची पादशाई आमच पादशाहा छेत्रपती महराज त्याच जयेप्राताप आमच मस्तकी असता सर्व पृथ्वीचे राज संपादितो आजवर संपादित आलो पुढही सपादितो तुमची तमा[७] धरी (१४४) त नाही लढाई करावा हाच आमच नेत अैसे साफ उत्तर सांगितले आपले तर्फने वकील राजेश्री लक्षण बलाळ इरानीकडे पाठविले जे तुमही फौजसुधा माघारे जाणे यांतच भाईच्यारा[४] राहतो वकीलानी याचप्रकारे इरानीस सागितला इरानीस राग आला वकिलास तेच क्षणी निरोप दिल्हा रा (१४५) जश्री भाऊसाहेबास इरानीच बयावार[८] वृतांत वकीलानी निवेदन केला ते समई भाऊसाहेब याणी फौजीची तयारी करीली तमाम लहान थोर सरदार यास बोलाऊन आणोन सरफराज केला मात्याची माळा व पदके व कलगी व तुरे व सिरपेच व कंटी चौकडेव मंदिला व चादरा व घोडे व हती व पालख्या (१४६) वगैरे बक्षीसी

१. महत्त्वाकांक्षेनें, विसाराच्या लालबनें. २. शुजाउद्दौल्याची लावण्यवती पत्नी ३. योग्य, न्याय्य. ४. सलोख्याचे संबंध. ५. कलह (अ). ६. सुच्छद (फा). ७. क्षिति परवा. ८. तपशीलवार (फा).

दिली सर्वत्राकडून क्रिया घेऊन समस्त येक दिल होऊन जिवाजीव केली तेव्हा मातबर सरदार याणी भाऊसाहेबास उतर दिलह की आम्ही काही जिवाची तमा धरीत नाही इरानीस मोडितो त्याची तमा धरीतो की काये मारून गर्दीसच मिळवितो हाच निश्चयें सर्वांनी करून आ(१४७)पलेले स्थलास गेले तदनंतर प्रात:कालची तास मात्र राहिली असता नगारा करऊन नखीबास[1] ताकीद करावे यास सांगितले नखीबानी लस्करात फिरोन सर्वत्रास ताकीद केली की प्रात:काल होताच सर्वत्र सिलेपोस[2] होऊन तयार व्हावे म्हणोन त्याजवरून येकापरीस यक राणांगे रणभैरव नामे नामे लोक (१४८) दर रिखीबीस हत्यार करणार आंगी वीरश्री सचरोन निधानसमये जाणोन वीरश्री – वैभवाची श्रींगार केला मुखपटे, वाजीर घुंग्या[3] बाख्तर[4] व चिलखत व बिजाठा[5] गुरुगुजा[6] व कायेते व फिरंगा व बाके व बिचवे व वागनखे भाले काखेते व गुत्फे व निमचे[8] व गारभाडी[9] व करोल[10] या प्रमाणे आयुध हस्तकी (१४९) रूढऊन अतिस्फुरण अतिशय यैस युधास जावयास निघोन आडले नवे उमेदीनेच याणी सळ सोडुन तयार जाहाला आडके नी डाव्या सडका घोडयास लाविले या प्रमाणे फौजेची तयारी जाहाली भाऊसाहेबानी आपली सारी फौज सरदार आदि करून गोट सोडून बाहिर रणभूमीस येऊन फौजेच्या च्यार टोळ्या (१५०) केल्या दर ठोलीस पनाच हजारप्रमाणे फौजेची नेमणुक केली पूर्वकडे गोटपाटेसी घेऊन मल्हारजी होळकर पंनास हजार फौज व तोफखाना घेऊन उभा राहीला व उतरेकडे राजश्री विश्वासराव साहेब पेशवे व शेमसर बाहादर व जेनकोजी सिंदे पनास हजार फौज व तोफखानानिसी सिध्ध (१५१) होऊन उभे राहिले यक ठोली पंनास

---

१. राजविरुदें ललकारणारा भालदार (अ). २. हत्यारबंद (अ). ३. उण पावसापासून सरक्षण करणारे शिरस्त्राण. ४. चिलखत (फा). ५. शिरस्त्राण ६. गदा (फा). ८. टोकास चापट व रुंद असलेली वाकडी तलवार (फा) ९. चापाची बंदुक, गारेच्या चापाची बंदुक. १०. बंदुक स्वार (तु.)

हजाराची काही तोफा गोट संवरक्षणार्थ नामे नामे सरदार दाहा वीस व कारकून टेविले दक्षणकडे खुद भाऊसाहेब व यशवतराव पोवार व आपाजी जाधव पंनास हजार फौज व गारदी यैसी हजार व तोफखाना व कंपूसहित उभा राहिले येणे प्रमाणे सारीफौज सावध (१५२) गिरीने माडीस माडीस भिडऊन जुमस[1] न खाता यक स्वार व सिपाई सफटेतून[2] फुटू न देतो उभा राहिला निशाणाचे फरारे माकले सोडून लढाईस तयार जाह्ले हे वर्तमान यैकून इरानी याणी आपल्या फौजेच्या तीनी ठोळचा केल्या खुद आबदाल आली पंचेवीस हजार (१५३) फौजनिसी दरमयाने उभाराहिल सुजात दौला पंचेवीस हजार फौजनिसी डाव्या बाजूस राहिला मनसूर आली व नजीबखा रोहिला पंचेवीस हजार फौजानिसी उजव्या बाजूस राहिला येकूण पाऊणा लाख फौज नीट चालोन भासाहच्या फौजेवरी आली महरा (१५४) टे याजकडील तोफेची यक सरबती जाहाली तेव्हा दोनी फौजेत धूर फार होऊन येकास येक दिसेनासा जाहाला धुराने सूर्यकिर्ण आछादिली धरणी कंपायमान जाहाली या प्रकारे होऊन आपपर वळखेना यैस जाहाली दोनी प्राहरपरियत इरानी फौजसहित तोफा (१५५) च्या मारात सापडला तेथे इरानी कडील दोनी च्यार हजार ठार जाहाले धुराची निवारण होताच राजश्री भाऊसाहेब व विश्वासराव व मल्हारजी होळकर व जेनकोजी सिंदे याणी हरहर माहादेव यैस गर्जना करून नीट घोडे चालविले हातास हात फर्क न हाता इरानीवर चालोन गेले सुजात दौला (१५६) व मनसूर आली व नजीबखा रोहिला याणी दीन[3] दीन अैसी गर्जना करून चालोन आले दोहीकडील फौजेस भिडून गर्दी जाहाली तेव्हा शेमसर बाहादर जेनकोजी सिंदे याणी फौजेस पाटेसी घेऊन पुडे चाल घेतली तेथे मोटी मारामारी

---

१. दहशत, धस्की. २. रांग, ओळ (अ). ३. धर्म, धर्मरक्षणार्थ उत्तेजक ललकारी.

जाहाली व मोगलाच्या तीरदाजीच मार व कराचलीच (१५७) मार आगदी राहिली हात घाईस आले तेव्हा बाला व बिचवे व गुरे उजे व वपटे व कठार जमदाडे[1] व खजीरे व वागनखे व सांग[2] वगैरेच झपेठा भारी मारामाराची घाईच झोट येकमेकास मिटचो घालोन न धरणीवरी पडले पुढ घातलेले पाय माघे कोणी काढील नाहीत परम सक्रोध तवकी[3] आवसान धरून दाता (१५८) ने येकमेकासच चाऊ लागले मलयध्धास प्रवर्तील समरंगणी हारजीत आपले रूपविद्रुप आंगहीन जाहाले असताही वीरश्रीमध्ये प्रवर्तानें ज्या ज्या विद्या कडोविकडीच्या[4] होत्या वीरानी समरंगणीत आंगवणे करून येकमेकास दाखविले कोणत्याही युध्धे कर्मेस आन-मान केले नाहीत जीवाची (१५९) तमा न धरीता जाले भाऊसाहेबाकडील फौज व ईरानीकडील फौज येकमेकास मल लयुधहस्त चडला णालता प्रहरण बालत्कार महाराटे याणी मारून इरानी याच्या फौजेस माघारे सरकविले वीरानी जीवत्व तृण प्राय मानिले पुढे जीव रक्षणे तेच आंदेशा काही धरली नाही केवळ माहाकालाची आ(१६०)वसान येकमेकास जाहाला जे क्षेतकडून भूमीस पडले त्यास फिरोन उठावयास आवकाश पडेना वरदलीत तुडऊन पीट जाहाले रक्त बबाळ चालिला रक्तोदक कळेवर वीराची विभिछ शेरीर भयानेक वीरश्रीत बलोभठाभ्दुत होऊन गेले क्षतठाई ठाई लागली वर्मी ज्यास लागली ते गतप्राण जाहाले पचतास (१६१) पर्यंत येकघाई मारामारी जाहाली कोणास कोणी रणकदनी सिक्षा समक्षा वलखले नाही पिशाच वृत्तीस क्रोध तवलो जाहले शेस्त्रास शस्त्र संघटण होऊन खणखणा खणाटेत जैनी पुढता पावली परम भयानेक शेद्ब घे घे घे हे गर्जना उचंवळली कोणी कोणाच शेद्ब न यैकू पावे यैसी दुर्धरी जबरदस्तीची जाहाली नभ शेद्बेकडून दाटिला येकापरी (१६२) स येक शेमसेर बाहादर रणमदोन्नमत यैस क्रोध

१. लांब पल्ल्याची तलवार (यमदंड) (सं). २. लोखंडी भाला (सं). ३. परिपूर्ण, श्रद्धेनें. ४. पराकाष्ठेच्या.

नवला शेर्तच केली रक्तोदकाची पाट भूमीस वाहू लागली येकाची सीर शेस्त्रेकडून पाडील येकाच हस्त उडोन गेले यक पादहीन जाहाला येकाच उदरी घाय लागोन गतप्राण जाहालो कोणाची मस्तकी घाय लगोन तेथेच ठार जाहाले रणधीर रणांगणीच स्थितीस ( १६३ ) आले भाऊसाहेब याजकडील व इरानी याजकडील मिळोन पधर हजार मुर्दे तरवरीच ठार जाहाले त्या विरहित उभयताच फौजेत माणुस जखमी दाहा हजार सिलेदार व बारगीर[1] मिळोन जाहाले घोडी बारा ह्जार दोही कडील पडले इरानीकडील पावेणाशहे हती व दोनी हजार उठ ठार पडले या प्रमाणे सग्राम आतिशय जाहाला त्या जुजात[2] राजश्री (१६४) बलवतराव गणपत ठार जाहाला त्याच्या मुर्द्यावर मोटी दाटी जाहाली त्या समई राजश्री भाऊसाहेब याणी घोड्यावरून उडी ठाकून जीवाची तमा[3] न धरिता नीट चालोन फौजेत येऊन मिसलले ते समई जनकोजी सिंदे व त्र्येबक सदाशिव व महिपतराव चिटणीस व फि(१६५)रगो पोवार व राणोजी जाधव व धर्माजी भांडलकर व सताजी आवले व नरसोजी धोरात व हैबतराव सौलसकर व रायाजी पायगोड व नरसोजी बिर्दे व गुणाजी भाप-कर व लिंगोजी शेवलें व जयान महमद व बाबाजी ढपले व आंदाजी सलगर याणी घोड्यावरून येकदाच उड्या ठाकल्या तेथ मारी मारी भारी जाहाली(१६६) ते कौतुक स्वर्गवसी श्री देवद्रा-दिकानी व समस्त देवानी पाहावे धन्य त्या वीरश्री वैभव रणो उछाव तेथे भाऊसाहेब याजकडील मिलोन पाच सात सेहे खासे सरदार ठार पडले बलवंतराव गणपत याची मुर्दा बळजोरीने भाऊसाहेबानी आपल्या फौजेत आणिला (१६७) इरानीस नामोरा[4] कल्यावर मर्दुमीची सीमा जाहाली आबदाल आली खिन दिल होऊन बोलिला जे ईलाईची[5] येक सानित तफावत पडली याजकरिता

---

१. मालकानें दिलेला घोडा घेऊन लढणारा शिपाई. २. युध्दांत. ३. क्षिति पर्वा. ४. नामोहरम, निराश. ५. पराभूत. (?)

आम्हास आपजेये प्राप्त जाहाला वारंवार याद करून विस्मयाते पावता जाहाला लढाईची शेर्तता होऊन गेली दखणी लोक महराटे थोर हरामजादे कराचलिची (१६८) मर्दुमी जोरावर आपणा परीस जादे मार ज्यान यामाघे आपली पादशाईची मर्दुमी उरत नाही सबब फौज शहक[1] होणेच काम बेहतर आहे या प्रमाणे बनोने आल म्हणोन दिलगीर होऊन योचिना करीता जाहाला राजश्री भाऊसाहेबानी इरानी यास याच्या गोठा परियत शर्त मिर्दुमी[2]न घालविले भाऊसाहेब ते (१६९) थून निघोन आपल्या तळावरी आले जे जे सरदार नामे नामे ठार जाहालेले धारकरी त्यास रणभूमीहून आणऊन माती दिली कितेकास दहन करविले या खेरीज अनिवार मुर्दे पडलेले त्यास माती द्यावयास आनकूल पडल नाही प्रत्यक्ष या कलयुगाच्या ठाई भारथी युध्धासमान युध्धास समान युध्ध जाहा (१७०) ला भाऊसाहेब याच्या फौजेतील धारकरी पडल नामाकित सरदार याची नावनिसी तपसीलवार.

| | |
|---|---|
| १ बळवतराव गणपत | १ आंदकाजी मोरे |
| ,, कृष्णाजी मोरे | ,, नेमाजी मोने |
| ,, चिमणाजी वलके | ,, भवानराव साळुंके |
| ,, सोनजी सलके | ,, येमाजी मुरार |
| ,, गोविंदराव कनसे | ,, दुजबरसिग |
| ,, रायाजी भापकर | ,, संतोजी वाघ |
| ,, ध्यानसिंग | ,, रामाजी सीरोले |
| (१७१) ,, सताजी ढवले | ,, जिवाजी जाधव |
| ,, तुकाजी गरुड | ,, सिवाजी कडले |
| ,, सयाजी थारात | ,, रामाजी घोगरे |
| ,, हणमंतराव सितोरे | ,, रायाजी कारले |
| ,, हिरोजी रणनवरे | ,, येमाजी राजगिरे |
| ,, हणमाजी नाचले | ,, खंडोजी चवरडाले |

---

१. ईश्वरी इच्छा. ७. मर्दुमी पौरुष.

| | | |
|---|---|---|
| | १ पिराजी मोहते | १ धर्माजी पावर |
| | ,, लखमाजी गोर | ,, नागोजी दलवी |
| | ,, रहिमानखा गोरी | ,, लखमाजी गजरे |
| (१७२) | ,, नरसोजी चापडे | ,, सयाजी माने |
| | ,, लखमाजी सावत | ,, रामराव माने |
| | ,, मानाजी वघ | ,, तुकोजी थोरात |
| | ,, मिश्याजी पडवले | ,, बयाजी मात्रकर |
| | ,, सिदोजी राणे | ,, रामजी साटला |
| | ,, भिकाजी पैकाते | ,, कर्णाजी बडगर |
| | ,, मानाजी घुंगरे | ,, येशवंतराव जगताप |
| | ,, मलहारजी काटकर | ,, रामचेंद्र केशव |
| | ,, बदरीराम रजपूत | ,, लिंगोजी आजुरे |
| (१७३) | ,, मानाजी रणसिंग | ,, हटसिंग रजपूत |
| | ,, गिरमाजी देव | ,, जिवाजी सिरके |
| | ,, आनदराव माने | ,, भिकाजी नवरे |
| | ,, मलकोजी माने | ,, कुबाजी पोळे |
| | ,, भिमाजी पोवार | ,, आपाजी चारले |
| | ,, मालोजी हरके | ,, सकरोजी चारले |
| | ,, बयाजी सिखले | ,, मंकाजी तोडले |
| | ,, गोदाजी थोरवे | ,, लिंगोजी धनवडे |
| | ,, गाणोजी निकम | ,, काळोजी माने |
| (१७४) | ,, गोपालजी सलगर | |
| | ,, फतेराम रजपूत | ,, विठोजी पाले |
| | ,, येमाजी गाफणे | ,, हरी विसाजी |
| | ,, येमाजी चवंडे | ,, धावजी माने |
| | ,, रजाजी झिगाड | ,, आपाजी बंड |
| | ,, गणोजी मानरे | ,, भिकाजी लगे |
| | ,, येसाजी भाडवले | ,, सिदोजी थोरात |

| | | |
|---|---|---|
| | १ आपाजी हलबे | १ यमाजी भापकर |
| | ,, मलहारजी होलकर | ,, नरसो वेकाजी |
| | ,, लिंगोजी कुराडे | ,, गंगाजी सिगोड |
| | | ,, सिदाजी जाधव |
| (१७५) | ,, मणीराम रजपूत | ,, सिदोजी पाळकर |
| | ,, कृष्णाजी पोवार | ,, येमाजी टकले |
| | ,, विठल हरी | ,, आवाजी मोरे |
| | ,, गंगाजी खराडे | ,, मकराजी वघ |
| | ,, शामराव बड | ,, मानाजी दुर्ग |
| | ,, दामाजी सिगोटे | ,, सटवाल दुर्ग |
| | ,, नारो गोपाल | ,, कानाजी सुटे |
| | ,, मायाजी जाहामेन | ,, लखमाजी गांटे |
| | ,, सयाजी गुलगुजे | ,, सिदोजी घुगुरे |
| (१७६) | ,, धर्नसिंग राणे | ,, नावजी जाधव |
| | ,, गंगाधर नारायेण | ,, देवदाज रजपूत |
| | ,, नारायेणराव गरुड | ,, जानोजी मोरे |
| | ,, जिवाजी अपटे | ,, सटवाजी पिसाले |
| | ,, नानाजी घोरपडे | ,, जिवाजी घुगरे |
| | ,, पद्माजी पाटणकर | ,, नारोहरी |
| | ,, सताजी नलगे | ,, हनमाजी मारे |
| | ,, रायाजी मसपे | ,, भिमाजी निनगडे |
| | ६२ | ६२ |

(१७७) येणे प्रमाणे सरदार दाहा हजाराचे व पांच हजाराचे व सातशे हेच दोनी सेहेचे पथके दार जुजात ठार जाहाले या खेरीज काफले[1] भारी खफले शभारे सवाशेहे पर्यंत जेर जखमी जाहले ते लोक काही जगतील असे दिसत नाही तयासिवाय धारकरी लोक

१. लमाण्यांचा तांडा, समोह.

पाच हजार ठार पडल त्याची नावनिसी लिहिता पुरवेना या प्रमाणे खतले जाहाल इरानी कडील आबदाल आली व सुजात (१७८) दौला व मनसूर आली व नजीबखा रोहिला याज कडील नामे नामे सरदार ठार जाहाले रोहिले व मागले व पठाण व रांगडे व रजपूत व काटे बडले व क्षेत्री व कायत[२] व भिल व मारवाडे याची नावनिसी तपसीलवार

| | | |
|---|---|---|
| | १ खादरखा दखणी | १ मुसा मु सीखो बेक |
| | ,, गोरीखा लाल | ,, गाजेखा पठण |
| | ,, महमद हुसेन | ,, गालीखां मयाण |
| | ,, जिरावतखान | ,, लालखान पठाण |
| | ,, दाहूदखा गोरी | ,, लालखा पठाण |
| (१७९) | ,, फकीर दाऊदखा | ,, तख्तेखान पठाण |
| | ,, आर्जुनसिंग दानव | ,, ज्याहामतखान |
| | ,, इजाम फतखान लाले | ,, रुस्तुमखा पठाण |
| | ,, मर्तुजाखा लखनो | ,, धनसिग मारवाडी |
| | ,, दाहुखान बलखवाले | ,, हुफरतखान दलाल |
| | ,, गयासिग चौबा | ,, ज्यानयेतखान |
| | ,, आलीखान लाहूर | ,, इमामखा गोरी |
| | ,, गुलाबखान हानी | ,, मानेखान हानी मुलतान |
| | ,, इजातखान | ,, घनसिग रजपूत |
| (१००) | ,, अनंतदौला रजपूत | ,, केसर्वसिंग |
| | ,, फतेखान लालमया | ,, धर्मसिग तिवारी |
| | ,, माधर्वसिग | ,, भेदावरसिग दुबे |
| | ,, गंगासिग रजपूत | ,, मिराखा पठाण |
| | ,, भवानसिंग | ,, सईदकादिर |
| | ,, शेमसेरखान | ,, मानेखान गोरी पठाण |
| | ,, हुशेनखान | ,, कमालखान |
| | ,, हैदरखान | ,, गंभीरसिंग |

| | |
|---|---|
| १ किलावंतखान | १ फतेसिग |
| ,, गालजखान | ,, वामनसिंग |
| (१८१) २४ | २४ |

१ कोनरी गोड सरदार आसामी

येणेप्रमाणे इराणी आबदालआलीकडील खासे सरदार ठार पडले आबदाल आली व सुजातदौला व मनसूरआली व नाजीबखा रोहिला याला याजकडील धारकरी वगैरे सिलेदार पायदल याची गणती लिहिता पुरवेना तगदमा[1] सुमारची गणती लागली नऊ हजार पठाण ठार जाहाले (१८२) यैस खतल जाहाले याप्रमाणे इरानी कडील वकीलानी भाऊसाहेबास विदित केला दुतर्फा नाशबहुतच जाला इरानी आंतरयामी हियाने सोडिता सुजातदौला व मनसूर अलीस बोलिला. जे इनशाला अलोन [4] बेडी गजब केला मराटे बडे हरामजादे हटले आठोपता दिसत नाही सलूक करणेचे बेहतर आहे लढाहीच मनसुबा या उपरी करू नये भला (१८३) ई करावे इस बातमे खुबी आहे महराटे येसी लढाई करून परिनाम लागणे कठिण आहे म्हणोन बहुता प्रकारं सागितल असता खातिरेस न आणिता सलूक करणेच राजकारण मनसूर आली व सुज्यातदौला व नजीबखा रोहिला याणीं राहाविले मनःपूर्वक सलूक करणेच हेच अमित्राच्या चिती होती यात तफा (१८४) वत नाहीं परंतु प्रारंभापासून राजश्रीं भाऊसाहेब याच्या चिती सलूक करावेयाच नाहीच हाच निश्चय जाणोन दुसरे वेळा युध्ध जाहाला यावरी इरानी याणी आपल्या जागयावर कोटे चलबिचल न होता हटून राहिला येकच ठिकाण येक मास समग्र रहिला जखमीं लाकाची बरदास्तीं व्हावी लागतीं लढाईत जाया जखमी जाहालेले लोक बेदिल[2] आहेत त्यास सर (१८५) फराजी करून दिलदिलासा[3]

१. अनुमान धपक्यानें गणना करतां (अ). २. व्यग्रअन्तः करण. ३. मन उलहसित व उत्तेजित करून. (४) अल्लानें बडा गजब केला.

देऊन येकदिल करून द्यावयामुले जुमस[१] न खाता दम धरून राहिला तसच भाऊसाहेब याणीही तरतूदीस लागले सरदार लोक मानकरी भले लोक वगैरे सर्वत्रास समाधानाच्या गोष्टी सागून ज्या ज्यास जखमा लागल्या होत्या त्याच्य त्याच्या टिकाणास सरदाराच्या डेऱ्यास जाऊन सिलेदार बारगीर पायदल आदिकरून सर्वत्रास दिल (१८६) दिलासा देऊन समाधान केला राजी करून घेतले भाऊसाहेबास फिकीरी बहुत पडली सारांश कोटे ही जाऊन दाणा वैरण आणेवयास जागा नाहीं इरानी याच्या लस्करांत आमदानी आहे येमुने पैलीकडे जाऊन दाणावैरण आणोन लष्क-रात खेप आणोन भरपूर करितात आपणास माहा सकट येऊन पडले आहे परंतु उपाय आणुमात्र (१८७) चालेना लस्करात फाके पडले आतरवेदी पासून गोविदपंत बुदेल पंधरा हजार फौजानिसी रसद येताना मनसूर आलीं व सुजातदौला व नजीबखा रोहिला येमुना-पार होऊन जाऊन त्याजवर छापा घातला पधरा हजार फौज आगदी बुडून लटून फस्त केले युध्द भारी जाहाला गोविदपंत बुदले ठार जाले त्याची सि (१८८) रछेद करून अमित्रानी नेहले चहु-कडोन रस्ता बंद जाहाला दिवसा दिवस आन्न मिलेनासे जाहा-ला च्यार च्यार फके आन्नविरहित घडले घोडी वैरण दाणाविणा: मरू लागले निधान समई य प्राप्त जाहाला हे खबर अमित्रास कलल त्या वरून त्याणी संख्यत्वची व युध्धाची गोष्ट माघ ठाकली अन्ना-करिता माणसे मरू लागली भाऊ (१८९) साहेबास बहुत संकट घडलं ीन निश्चक्र[२] सारा लस्करास घडल तेव्हा मातबर सरदार दमाजी गाइवाड व मलहारजी होळकर व अताजी माणकेश्वर व जनकोजी सिदे व येशबतराव पोवार व सताजी आटवले व लहान थोर सरदार मिळोन राजश्री भाऊसाहेब विश्वासराव उभयता कचेरीच्या डेऱ्यात बसल होत तेथ सर्वत्र सरदार वगैरे आले यका (१९०)ती खलबत केले मलहारजी होळकर आदिकरून थोर थोर

१. कचनखातां, दहशत न धरता. २. निर्जली निराहार.

सरदार म्हणू लागले की भाऊसाहेब आजपर्यंत तवाई[1] सोसली आज तीन दिवस लहानथोरानी चूल पेटविली नाहीं तीन उपोषण जाहाले घोडी दाणा वैरणामुळे मरू लागले भाऊसाहेबपुढे आम्हास काये गती योजल आहो ते कलेना युध्ध करून न मरता आन्न (१९१) नसता मरावे लागल आन्न विरहित हातपायांत तखवा[2] काडीमात्र राहिला नाही पुढ कोणता जंग आम्ही धराव तुमही आजपर्यंत येश सपादिलले ते आगदी गमाविली सारी दौलत बुडविली विनाशकाळा सारखी भाऊसाहेब तुमची बुध्धी जाहाली आमची रांडा पोरेदेखील आमच्या देखता इरानी घेऊन जातो असा निधान समय प्राप्त जाहा (१९२) ला तुमच्या बुध्धीस ईश्वरानी कसे विपरित केले ते न कले कोणाची मसलत तुमही येकली नाही दोनी वेळा आनिवार युध्ध करून इरानीस नामोरा[3] करून झर्झरीत केला उत्कृष्ठ येश ईश्वरानी आम्हास दिलहा इरानी शरणांगत येऊन सलूक करावे याच संधान लाविला तेव्हा त्याजवर आमच जर्ब टेऊन खंडणी व रा (१९३)ज्य त्या पासून घेऊन येश घेऊन जाव म्हणोन तुमहास आमही मसलत सांगितलीं परंतु ते आपण न यैकता विनाशकाळ सारिखा विपरित बुध्धी कर्मानुसार घडोन आली तुम्हास श्री ईश्वराने आमर वैभवाची संपदा आनंत हस्तेकडोन आपलेली असता सुखोत्पती वितरित्क व्हावे हा नीच प्रसंग प्राप्त जाहाला (१९४) सुबुध्धी सांगता तुमहास भाऊसाहेब आम्ही श्रमी जाहालो परतु पुढ होणारा सारख घडोन येते ते कलपांती सुटत नाही पूर्वी रावणास सर्व बोधविले असता विधि निर्मित काही व्हावे यास चुकत नाही आपला वैभव संपदा आपले हस्ते दशननान विध्या सीकल कची राज्य बुडवि ला संपूर्ण स्वर्गवासी देव व पाताल वा सिवभूदर किंन्नर येक्ष गर्धव सिधचा (१९५) रण आदिकरून ज्याच्या आंकित सर्व देवदानव

---

१. विपत्ति, दुरवस्था. २. शक्ति (फा). ३. नामोहरम, पराभूत.

यास कराग्रही घातले होते चवदा चौकडीपर्यंत राज्या आनभवित असता दुर्बुध्धी प्राप्त होऊन श्री दशरथात्मज श्री रामचेंद्र यासी असख्यत्वे करून समूळ राज्य वैभव वंशसहित दिवा ना बाती जाहाली यैसा प्रसंग भाऊसाहेब तुमहास प्राप्त जाहाला पूर्ता चि (१९६) तांत आणिले पाहिजे आम्ही किती प्रकार कोटपर्यंत तुमहास बाधे कराव तुमच्य वैभवेस पाय फुटल समूळ होऊन येकदा जाते इरानीस या समई ईश्वर आनकूल जाहाला त्यास जये प्राप्त होईल अैस निश्चय दिसून आला ईरानी हातून तुमची नि:पात होईल अस वाटते यास सशय नाही यैसाच आर्थ समजोन आला पूर्वी द्वापारी दुर्योधनास भीष्म द्रोण (१९७) कर्णादिकानी पांडवस राज्य विभाग देऊन श्रीकृष्णासी संख्य करून आपले कल्याण करून घ्याव म्हणोन पुष्कल बोध पदोपदी केला परंतु ते सागणे तुछ करून कोणाचीही बुध्धी न यैकत आपल्या दुर्बुधीन पाडवास विरुध्ध करून युध्ध करून आपले अैश्वर्यंसहित कुलक्षय करून घेतला रावणास व दुर्योधनास हट निग्र (१९८) ह केल्याच लाभ काय म्हणाल तर धारतीर्थी युधांत मरण जाहाल्या मुळे विरादिकास वीर स्वर्ग प्राप्त जाहाला तेणकेडोन परोपकार घडला आपणास उतम लोक प्राप्त होऊन स्वहित घडल आन्न नसता मरण होऊन आधोगतीस जावे या परीस युध करून रणांगणी देह विसर्जन करावे म्हणजे तुमहास व आम्हास वीर स्वर्ग प्राप्त होईल हाच (१९९) मोठा लाभ आम्हास तुम्हास जाहाला निछचय करून येथच कुरु क्षेत्री आम्ही देह विसर्जन करून परल्लोकी शाश्वत पद सपादावे हे चांगल कौर व कूळ सपादा व सहित याच जागा कुरुक्षेत्री हाच महिना हाच दिवस विक्रम सवछर हे तिथीस आटरा क्षोणी सैना आटरा रोजात कुरु वृधादिक लया (२००) ते पावले तीच गती भाऊसाहेब तुमहास आम्हास घडोन आलियास आन्य उपाय नाही लस्कराची हलाकी आम्हाकडील इरानियास कळली तुम्ही

सर्वस्वी बुता[1] यांत सशय नाही तुम्ही हारजीकही खातर निशा जाहाली तुम्ही काळ चेक्रांत पडला उतम गोष्ट घडोन आली तेव्हाच चित्तावर न घेता सलूका सपादिला नाही आता तो तुमच आवंका अमित्रा (२०१) स कळला तुम्हीचा हिया धरिला तो फळास आला आता कोणता येश सपादिणार सारी दौलत अविश्वासे करून वुडविली आम्हासारख केलो श्रीमंत कैलासवासी बाजीराव व चिमाजी आपाच वेळेच कदीम असोन हाली दौलतीस सामी तुमही आमची गोष्ट न येकल्यामुळे आली आपेश आमच्या माथा आला पूर्वी कैलासवासी राव व आपा आमची गोष्ट येकत होते श्री (२०२) मंत राजश्री नानासाहेब या प्रसंगी असते तर येवढा इकाम[2] व आता येवढी दोन अडीच लक्ष फौजनिसी बुडता आणि तुमही प्राणानिसी जाता तुमच्या चितींत विकलप आला आसेल की इरानीस जाऊन हि गोष्ट सांगतात असे तुमच्या समजण्यात असेल परंतु आम्ही क्षात्री धर्माच विराधिवीर युध्धाची इछा निरतर करणार रणोछवे आम्हास जीव तृणसमान आहे वीर (२०३) स्वर्ग व्हावे हाच आमच धर्म होय इरानी म्हणजे आम्हास तृणतुल्य[3] त्याची पदार्थ काय आपल्या कल्याणार्थ सागतो मनसुबादार कोणी भाऊ-साहेबाबरोबर नव्हते म्हणोन मसलत बिघडली म्हणोन श्रीमत नानासाहेब दोष टेवतील याजकरिता आपणास बोध कर्णे प्राप्त या उपरी आम्हावर दोष नाहीं तुमच आन्नाचे आमच शरीर स्वामीकार्या-वर देहत्याग करितो हे निश्चात असा (२०४) व परंतु पाहाता आर्थी हाली आन्नाविरहित शरीरात तखवा काहीच नाही तेव्हा युध्धाची शक्ति कसी येईल आम्ही काही जीवाची तमा धरीत नाही आणि राडा पोराची आशाही धरीत नाही होणार भविष्य होतो यांत काही संशेय नाही भाऊसाहेब आपण सर्वत्राच घात करिता आपल्या वैभव बुडविली विता हे प्रमाण आहे धीर धरावयाच काही शक्ति उरली नाही आन्नाविणे (२०५) माणसे व वैरण विणे घोडी तळवर मरतात तेव्हा निर्बळी होतो

१. बुडता (?). २. असें विपरीत कृत्य. ३. निरर्थक आहे.

इरानी आम्हास लुटून फस्त करितात आमच हाल बेहाल करून मागती राडापोरा बोभाटवितात यास तथा नाही देहयात जीव असता आम्हास धरितात याज करिता युध्ध करून मारीत मारता मरावे येश श्रीनी दिलह तरी घ्यावे नाही पक्षी सर्वत्रानी खपून जावे शमसराची आंग जी शर्त करून सोडावी पर जिव (२०६) त असता वैरीयास येस घेऊ न देता हिदुधर्म रक्षावे रांडपोराच्या आपल्या हातून शकला करून ठाकण्या श्लोक[1] जर करिता येश श्रीसदाशिव व दिलहे तरी कर्तिध्वज कंकणाकित जगतिच्या ठाईस ईजच लागतील जय न आलियास व गवपा होऊन साभाळून निघाव आम्ही सर्वनी करार केले आहे भाऊसाहेब तुमही आता माघे पुढ न पाहावे बाकी काही राहिली (२०७) नाही आकाळी प्राण आन्नाकरीता सर्वानी सोडावी लागतो हात पाय घासोन मरावया परते दुसरे नाही कोणती गोष्ट ही भाऊसाहेब आपल्या चितास न आली म्हणोन सरदार बोलताच या प्रमाणे साऱ्या गोष्टघा सरदार याच्या येकोन लहानापासून थारासी भाऊसाहेबानी मनोगती सांगितली जे होणार आहे ते ईश्वर (२०८) सत्यने घडून येते आपले आनिष्ट करून घेणे काही चितांत नाही देवगती घडून आलियास उपाये कोणताहि नाही संकटसमई वैरियास देखील न आसावे श्री मन्माहाराज छत्रपती भोसले यास श्री देव प्रसन होऊन सतावीस पिडघा राज्य आनभववे म्हणोन वरप्रदान आहे त्याची शेवा आम्ही करितो स्वामीकार्यावर येश अथवा आपशा देणार श्री सदासिव समर्थ अ (२०९) हे आता तरूणोपाय मनोहिया मर्दुमची धरून शमशराची शर्त करावी माघे या कुरूक्षेत्रीं पांडव व कौरव लढोन धारातीर्थी प्राण अर्पण करून सैन्य सुधा सुस्नात जाहाले या परता पराक्रम कोणताही नाही सर्व संता करणी श्री सदाशिवची त्या सारिख घडून येते आहे तुमही दोष टिविला त्या प्रमाणेच घडून आले होणार (२१०) भवितव्य चुकत नाही पुढील आर्थ कोणता

---

१. श्लोक लिहावयाचा होता, जागा सोडली आहे.

तो चितात आणिला पाहिजे तेव्हा येश तुम्हा समस्ताची आहे येहेलोकी परलोकी कीर्ती करावी यातच पुरुषधर्म पराक्रमी आभिनव आहे निधान[1] समई श्री सदाशिव समर्थ असता इरानी याच तमा धरितो की काय मारून गर्दीसच मिलऊ कीर्ती करून मरावे यांतच भूषण आहे या परते दुसरे गोष्ट नाही आ (२११) ता भय धरल्याने होणार काय उदईक तयार होऊन खदख[2] पार होऊन गोट सोडून निघावें आणि मारिता मारिता मरावयापरता दुसरा मानस नाही हा निश्चय भाऊसाहेबानी समस्तास सांगितले ते मान्य सर्वत्रानी करून लहान थोर सरदारानी जीवाची तमा न धरिता युद्ध करितो म्हणोन भाऊसाहेबास क्रिया दिली नतर वस्त्र भू (२१२) षण अलकार देऊन समस्तास गौरविले स्वहस्ते विडे भाऊसाहेबानी सरदार लोक वगैरे सर्वत्रास दिलह आपआपले टिकाणास जावे यास निरोप घेऊन गेले त्यानंतर राजश्री विश्वासराव व थोर थार सरदार सदाशिव त्र्यंबक व महिपतराव चिटनीस व अ अंताजी निबाळकर व आपाजी जाधव व सिवरामपंत व अंताजी माणकेश्वर व शमसर बहादर इत्यादिक येकांती विच्या (२१३)र करून येकमेकास निर्वाणका[3] केल प्राणावर गोष्ट टेऊन बनली होणार भावितव्य घडोन आले चिरजीव विश्वासराव नानासाहबाचे पंचप्राणाचीहि प्राण नानासाहेबानी विश्वासराव यास आम्हा समागमे माहिमेस पाटेवीत नव्हेत गोपिकाबाईनी आमच्या मनोधारणास्तव पाटविले आनुचित गोष्ट घडली विश्वासराव तुमच वय लाहान तुमही का (२१४) ही दौलतीची सुखोत्पती अनभवली नाही तुम्हासारखे गुणाढ्या विद्यासागर धैर्यवंत सौंदर्य सुकुमार नानासाहेबाचे जेष्टपुत्र कुलदीपक तुमच ठाई उभयेता वडील माता पित्याच मोह ममता अत्यंत असे आसोन मी आपल्या समागमे तुमहास घेऊन आलो श्री सदाशिवने माझ्या विभागास तुमची अकल्याण केल्याची च आपशेद्व दोष आणिला जननी (२१५) द्यांता प्राप्त जाहाली तुमच

१. अतिमस्थान, मृत्यु (?). २. खंदक. ३. संकटांत टाकले.

वय मी आपल्या करवी कुठारे करून छेदन केला असे प्रारब्दी होते चितांत ममता स्मरून भाऊसाहेबास परम दुखाच गहिवर दाठोन आले आश्रुपात जाहाले विश्वासराव तुजला मरणाच्या घरास-मया आणिला तुमहास आणावे ही गोष्ट अगोधरच आम्हासर्वापासून गेली तुम्हास आणावयाच नव्हते वडील नानासाहेब व गोपिकाबाईच शद्ब आम्हास (२१६) लागला कालिमा श्री महेश्वर लाविली आम्ही-ता सतीच वाण घेतले या नंतर जिवंत नानासाहेबाचे चेरण पाहातो असा काही आर्थ दिसत नाही हा दूर काळ चेक्रव्युहात सापडलो अतकाच्या[1] तोडी पडलो विश्वासराव याच प्राण आमच्या हाती घेतलो लेकरास प्राणसंकटी घातल नानासाहेब याणी विश्वासराव याच विपरित वर्तमान यैकून प्राण टेवणार नाहीत हे आम्हा (२१७) स पुर्त केलेले होणारास काय गती करावी याज-प्रमाणे भाऊसाहेब बहुत श्रमी जाहाले स्तद्ब होऊन दुखाचे श्वाषे श्वास ठाकून लागले तेव्हा विश्वासराव याणी भाऊसाहेब यास सम-र्पक ममता युक्त प्रत्योत्तर दिले की आपण सर्वश्वी वडील मी लेकरू तुम्ही मस्तकी छत्र असता सतोषाचे दिवस प्राप्त होतील तुम्ही वडील सकळर्थी बुध्धी वैभव तुळिता श्री सुरुगुरुसही परते केले प्रतापसूर्य व (२१८) डील नानासाहेबाचे पचेप्राण सर्व इमारत बडिलावर पराक्रमी सर्वार्थी आपण वडील समर्थ असता सतोषेच आहे वडिली तो यासमई निधान केले होता दिवस सकठाचे दुर्धर नानासाहेबास होतील परंतु वडीला सारखे अतिरथी महा-रथी सर्व गुणसंपन्न श्री परशुरामावतार तूर्त त्रलोक्या[2] शोधिल्यास मिळाणार नाही या गष्टीची परम चिता मजला प्राप्त जा (२१९) हाली आहे की बहुधा पूर्णाहुती व्हावे यास आलो ममता मज लेकरा-वर असो द्यावी पुढील आर्थांची संकेतता मजला दर्शविला मज-विषई आनुमात्र श्रमी न व्हावे दुर्घट समय प्राप्त जाहाला आहे या समई प्रतापशूरत्व करून आभिनव कर्ती संपादावी या पेक्षा येश

१. मृत्यु. २. त्रैलोक्य.

कोणता आहे हे देहे अ।नित्य नाशवंत आहे देह्यात चे (२२०) तन्य[1] आहे तो पर्यंत सुकीर्ती दिवकर रणागंणाच्या ठाई उदय करून भीम पराक्रम दाखविल्यास श्री निर्जराधिपयास आजेब कौतुक दिसावे व वडिलला देखता याग्येता सपादून शौर्यं कर्माचरण करून कीर्ती आस्वदता जोडिली या माझा पुत्रपिणास विहितच आहे प्राणरक्षणा विषई चितात मला आणुमात्र नाही पूर्वी महाभारती आर्जुन पुत्र आभिमन्यु (२२१) ही राजकुमारानी कर्तीध्वज लावाने रणागणी पराक्रम करोन शत्रूच जय संपादन करून हेह लोकी कर्ती परलोकीं सौख्यता सपादोन गेले त्याच प्रमाणे आमच्या विभागास ईश्वर कृपेने हा समय युध्धाच घडोन आला या पुण्यास पारावर नाही या समई उतम पराक्रम करून रणांगणी हे वर्तमान सुरलोकी सोख्यता स्पद पावल या प्रकारच हा कुरूक्षेत्री येथे प्राण(२२२)त्याग जाहालीया बहुत उत्तम आहे वडिली निभ्रात्त[2] संतोषरूपे असावे मजविषई द्विग्रता चितांत न आणावे म्हणोन विश्वासराव याणी काया वच्या मन त्रिकर्ण[3] पुरस्कार निश्चय क्षात्रधर्माची धर्म आचरोन वीर स्वर्गाची इद्य[4] धरून धारातीर्थी प्राणत्याग करावा हा निर्धार करून हा समय पुनरपि कधीच मिळणार नाही भूलोकीच सोख्य औश्वर्य आशाश्वत (२२३) परलोकीच सोख्य शश्वत हे धरढतर[5] मनन करून मजविसई चितासागरी निमग्न होऊ नय उभयेताही वीर स्वर्गाची इच्छा करावी येशस्व आला आस्ता उत्तमच आहे हाले म्हणोन भाऊ-साहेबास प्रत्यांतर विदित्त कले भाऊसाहेबानी ज्या दिवसी लढाईच निश्चय करून सरदार लोकास तयारी होणेविसी सागितली ते दिवस निश्चक्र[6] उपोषेण केले रात्री भाऊसाहेब व विश्वासराव याणी साखरपाणी बता(२२४)शें पेडे मात्र भक्षंण केले तेव्हा दोनी प्रहर रात्र जाली तिसरे प्रहर रात्रीच्या आमलात निद्रा सपादिली परंतु

१. प्राण. २. भरपूर, निःसंशय. ३. तिन्ही द्वारीनें. ४. इच्छा (?) ५. दृढतर. ६. पाणी व अन्न यावांचून.

चितांत चिता तुळीता तटस्त जाहाला भारी काळजी पडली सावध होऊन तास रात्र पहाटेची उरली तेव्हा नकीबास[१] आणऊन फौजेस ताकीद कर्णें विसीई आज्ञा केली की लाहान थोर सरदार वगैरे यास प्रात:काळी सिले[२] पोसनिसी तयार होवणेविसी हुकूम करून (२२५) नतर आपण हतीच तरदुदी राजश्री भाऊसाहेब व विश्वासराव याणी स्नान करोन नित्येनेमादिक कर्म उरकोन फळहार केला विडे घेऊन उभयता जामदरखान्यास गेले तेथे रणागणीची वस्त्र घेऊन पोषाख केला उतमोतम शस्त्रे घेतली ज्या शेस्त्राचा वातस्पर्श होताच शत्रूचे सीर गेळेन पडावे यैसी देवता शेस्त्र एकापरीस येक आगळी अ(२२६)सी होती जरी चिलकत हटकोन सागितले जे आज निधानच समय आयुष्याची आवधी संपूर्ण भरली मरार्वयास सतीच ठाण (वाण) घेतलेय परता चिती दुसरी कल्पनाही तुम्ही पुरातन शेव कैलासवासी तीर्थरूप बाजीरावसाहेब व चिमणाजीराव आपा याच येल्यारी आज पर्यंत पेशवाईच आभ[३] भक्षिले आहा त्यासी चीज करून स्वर्गी राव आपा तुमची स्तुती करा (२२७) वी यैस युध्धसमरंगणी करावे स्वर्गवासी उभयता वडिलानी तुमच्या हस्तकी दौलतसुधा आम्हास दिलहे आहेत या गोष्टीच मान आभिमान तुम्हा सर्वत्रास असावे व वडिलापासून आजपर्यंत जोडिलेले येश आजी रक्षावे म्हणोन भासाहेबानी सर्वत्रास पदर पसरोन सांगितले तेव्हा मलहारजी होळकर व दमाजी गायेकवाड व जेनकोजी सिदे व बळवतराव गणपत व महिपत (२२८) राव चिटणीस वगैरे थोर थार सरदार यानी भाऊसाहेबास प्रत्यातर सांगितले जे आम्ही काही जीवाची तमा[४] धरीत नाही आमचे शरीर आपणावरून सदका[५] आहे माहाराज छत्रपती याच पुण्य मस्तकी असता इरानी याचा भय धरितो की काय मारून गर्दीस मिळवितो भाऊसाहेब आपण

---

१. ललकाऱ्या. २. हत्यारबंद. ३. डौल, तेज. ४. क्षिति. ५. ओवाळून टाकणें.

चिता न करावी गजसमुदायात जसे सिव्ह सिरोन भक्षण करितो आणि कळप परा (२२९) भवितो तदानुरूप आज रणांगणी आमचा कौतुक पहावे यैसे निधान पुरुषार्थ बोलान घोड्यावरून मुजरा केले नंतर उतम दोनी गज शामला जलदप्राय नवरत्न जडित श्रिगारिले अबारीत भाऊसाहेब व विश्वासराव आरूढले भयानेक शोर्यकर्मं आगळे रण तुरंग[१] सैन्यासहित गर्जना करीत इरानी याजवरी जाते जाहाले जे विगधर्वनगर पर्यंत येका व ऐसे (२३०) आंगांत घातली टोप[२] मस्तकी रूढविले बिज्यामुख कपाळी लाविल्या त्याज नूतरत्ना कितीयच हिरेयुक्त मुक्ताफळाचे तुरे मकी लावल्या हस्त कडग जडाव्याच्या भूषणे कंठाभरणे दिव्य पदके मौक्तिकाच्या माळा घातल्या कटी बंद पेट्या मोतीलग कमर खचोन बाघोन पटे रूमे जनीबी घेतले जमदा कंठी बंद निवेटे मातीलग खोविल्य वागनखे वामहस्तकी वासविली (२३१) पठा कटी बाधोन शास्त्रायुद्ध घेऊन श्रीमंत राजश्री भाऊसाहेब विश्वासराव उभयता तयार जाहाले नौबत सुरू करून माहाभेरी करविला प्रथम नगरा जाहाला प्रातःकाल होताच दुसरा नगरा तयारीच जाहाला तमाम लाहान थोर सरदार वगैरे फौज सुधा तयार होऊन फऱ्यास राहाहून घोडे वरून मुजर केले तेव्हा ते भाऊसाहेब याणी मल्हारजी होलकर व दमाजी गायकवाड यास समीप (२३२) सैन्य नदीप्रवहासन्मुखे मेघोपम गर्जना करून विराधि वीर बोलते जाहाले की रणकदनाच्या ठाई आजी आमच्याच तमासा भाऊसाहेब आपण न्याहाळून पाहिला पाहिजे जीवत्व तृणप्राय मानून इरानी याच उपमर्द न करितो शत्रूच तमा धरितो हा आर्थ नाही आम्ही वीर नरकेशरी आहासन्मुख इरानी हा जेबुकावत उभा राहावे यास समर्थ नव्हे आ (२३३) जी भाऊसाहेब आपल्या कार्यावर प्राणास उदक सोडिला याप्रमाणे प्रतापीवीर याणी प्रतिज्ञा केली आणि युध्धास प्रवर्तेते जाहाले तेव्हा भाऊसाहेब याणी मलहारजी होळकर व दमाजी गाइकवाड यास विचारिले की कोणत्या

१. भोठे वगैरे. २. ध्वजा, पताका.

पध्धतीने सैन्याच व्यू चालावे आपले आवा कते शत्रु यावा ते कोणत्या प्रकारे करून येईल आपला बळ कोणत्या रीतीने पड. (२३४) त्याप्रमाणे व्युह रचना फौजेची करावी किंव्हा सफेजंगी[1] फौजेच गाहा करून नीट चालोन जावे किंव्हा फौजेच्या दोनी तीन टोळया कराव्या यात कोणते चंगले हे योजून सागावे त्याप्रमाणे करविता येईल फौजतून कोणी न कच खाता शत्रू पराभव होय आसा जमवावा मलहारबा तुही बुध्धीवत हमेशा युध्धाची रचना करून शेत्रू लयाते पावविले आहा हे तुम्हास सर्व दखलगिरी आहे आम्ही यात काही (२३५) माहीत नव्हे तोफखाना आदि करोन फौजेचा व्यूहू रचालवावा असी भाऊसाहेबानी आज्ञा केली तेव्हा मलहारजी होळकर व धारकरी सरदार याणी फौजेच्या तीन टोळचा केल्या डावेकडे विश्वासराव फौजसुधा उभा राहिले त्याजपासी सरदार येशवतराव पोवार पंचेवीस हजार फौजेचा सरदार युध्घ करावेयास माःहाभारतीसमान वीर जगप्रख्यात नामाकित वडिला वडिली कीर्तीवान पुरुष सामानय नव्हे व नर(२३६)सोजी भापकर व सताजी आठवले जंगी शमसर व जिवाजीपंत गोविंदपंत व गोविंदराव निबाळकर व दताजो ‌वाघे व संताजी माघ व फिरगोजी पोवार व माधवराव पोवार व चिमणाजी माने व हिरोजी पवार व यमाजी सलगर व कामाजी डोगरे या विरहित फुटपथके नामे नामे धारकरी सिवाय पायदळ इभरामखान गारदी सरदार हसन खान गारदी जमादार याप्रमाणे तीस हजार निवडक धारकरी पायदळ येणेप्रमाणे फौजनिसी मध्याभागी आंबारीत विश्वासराव (२३७) तरकस कमान घेऊन उभा राहिले वीरश्रीने परम रणोछाहाच्या उल्हास करून शेत्रूचा पराजय कराव भयाची काळजी आणुमात्र नसता पराक्रमने जय सपादावा हाच धढतर[2] वासना धरून हाती शेस्त्र घेऊन चेमकाविले विश्वासराव यास आभिनव लावण्याची सिगा[3] बानाने अली

---

१ खडाजंगी. २. दृढतर. ३. कमाल मर्यादा.

सिव्हा सा सारखी बालोन्मतता प्राप्त जाहाली इकडील सैन्य सदाविराधि वीर व्यूह रचना पाहोन आजब कौतुक वाटले जसा आर्जुनपुत्र आभिमन्यू तद्वत (२३८) विश्वासराव याच पराक्रम काही जसातसा सामान्य नव्हे शाणऊ[1] कुळीचे महराटे सारखे याचे शूरत्वचे धैर्य पाहोन दग जाहाले याप्रमाणे तारीफ विश्वासराव याची यासिवाय मध्यभागी ठोलीत राजश्री भाऊसाहेब पटे बाके बिचवे वागनखे तरकस कमान पुढ शराचे भाते कितेक भरलेले ठाण माण सरळ चौक लघु लाघवे कडो विकडी सधान साध्यतेच पराक्रम च्यातुर्यंता इरानी यास नष्ट करावयासी धनुष्य भातेसहित तुणीरातील शेर (२३९) इद्र गोप महुत सु व वर्णाच्या पाणि याच्या ढाळोन तेजःपुज्या प्रकाश युक्त शामपीछ शोभायेमान धनुष्यानी योजिता ज्याच्या आतियोगेच चेमत्कार अरियाच्य कपाळी भेदोन प्राणातकच व्हावे व्दापारी जसा आर्जुन माहाभारती संपूर्ण विराधिवीरात प्रमुख किव्हा संग्राम करणे या विसीई भार्गवराम आथवा सुराधप तद्वत सदासिवपंत भाऊसाहबे ब्राह्मण कुली नरावतार धरून तिथतीतळी इद्र किव्हां इद्रजीत हननी दाशरथी रामा (२४०) नुज्या याची उपमा भाऊसहेब द्यावेयास योग्यता आणि माहायोध्धे रणनाईकाचे सिरोमणी माहाप्रबळ प्रळयकाळाच प्रती भास्कर या प्रकारे वीरश्रीचे भीम तेजःप्रकाश रणांगणीच्या ठाई स्ति बानली आगोधर शरीर सामर्थ्या या वखीर कोनरी गोडा देसाई (का. फा.) दारने पाहिला घोरपडेस लिहून साहेबाचे समक्ष सर्व काळगा आपलाचा समजाऊन विनंती रघुनाथरावचे आज्ञा प्रमाणे तयार जाहाले–

–: समाप्त :–

---

१. शहाण्णव कुळीचे.

# मराठवाडा साहित्य परिषदेचीं प्रकाशनें

पुन्हां नभाच्या लाल कडा – बी. रघुनाथ मूल्य ३ रु.
कविता संग्रह

मोरोपंती आख्यानें – सं. प्रा. भगवंत देशमुख मूल्य २ रु.

चंद्रहास्यकथा – सं. डॉ. नांदापूरकर मूल्य २॥ रु.

तृणाची वेदना – तु. शं. कुळकर्णी मूल्य २॥ रु.
कथासंग्रह

साद – राम पिंगळीकर मूल्य १ रु.
कवितासंग्रह

## – बाल-साहित्यमाला –

प्रत्येकीं आठ आणे

लांकडी सासू आणि इतर गोष्टी, चार संत, हैद्राबादचे लोक, मुलांचीं गाणीं, हैद्राबादची ओळख, चार विद्यार्थी, अमर साहित्य, देशासाठीं

प्रत्येकीं सहा आणे

घमेंड जिरली, तीन शेजारी, चिमणचारा, भिकारी राजा, देवगिरी.

## – आगामी –

१. दासोपंतांची–पासोडी
२. रुक्मिणी स्वयंवर–कृष्णमुनि विराटदेशे
३. प्रतिष्ठान वर्णन–नागराज
४. मुक्त-मयूर भारतावरील प्रबंध–डॉ. नांदापूरकर
५. महाराणी व इतर कथा–दिवाकर कृष्ण